# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


१ ● स्वागत
३ ● अहिंसक समाजरचनेच्या दिशेने
७ ● जैवतंत्रज्ञान आणि 'जैविक दहशतवाद'
१२ ● जैवतंत्रज्ञान आणि भारत
१६ ● आनंददायक पत्रे
२० ● साहित्यातून स्त्रीवाद जागविणारी अल्फ्राईड जेलिनेक
२५ ● साखरेला (कडू) पर्याय
२९ ● शांततेच्या पाऊलखुणा (विकासातून शांततेकडे)
३१ ● जगाच्या पाठीवर....(आशिया: जैवतंत्रज्ञान)
३३ ● कालप्रवाहात......
३४ ● 'काल'चे 'आज'साठी



खंड ३ : अंक १० जानेवारी २००५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


Rew
Aal
4/1/05

**<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**<u>वर्गणीसाठी पत्ता :</u>**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ३ (अंक १०) जानेवारी २००५**
**संपादक - रमेश पानसे**
**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**
◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# स्वागत

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाच्या सुरूवातीलाच, महात्मा गांधींच्या अहिंसक समाजरचनेच्या स्वप्नाच्या दिशेने, अलीकडच्या काळात जग कसे झेपावते आहे, सुसंस्कृत असलेल्या सामाजिक नि राजकीय नेतृत्वाला कशाप्रकारे अहिंसेच्या दिशेने जगाची वाटचाल व्हावी, असे तीव्रतेने वाटू लागले आहे, याकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे केला आहे. भारतात आणि जगातही हिंसेच्या व्यवहाराला आपलेसे करण्याची लाट अधून -मधून येत असली तरी, दुसऱ्या बाजूला देशादेशांमधून अत्यंत विचारपूर्वक, मंदगती, पण नेटाने अहिंसेच्या विचाराकडे काही पावले टाकली जात आहेत याचे काहीसे प्रत्यंतर या लेखाने दिले आहे.

अर्थबोधपत्रिकेमधून साहित्याच्या क्षेत्रात घडणाऱ्या नवघटनांचा वेध फारसा घेतला जात नव्हता. परंतु ही उणीव या अंकाने भरून काढली आहे. यावर्षी साहित्याचे नोबेल पारितोषिक प्राप्त करणारी ऑस्ट्रियन लेखिका अल्फ्राईड जेलिनेक ही प्रामुख्याने तिच्या स्त्रीवादी विचारसरणीने आणि भाषेच्या परखडपणामुळे आपल्या वाचकांनाही आकर्षित करू शकेल. पत्रलेखन ही कला आता नामशेष होईल की काय, अशी भीती निर्माण होते आहे. पत्रलेखन हे खरे तर खाजगी असते पण माणसांमध्ये स्वतःतच एक वैश्विकताही वास करीत असते. विशेषतः मानवी जीवनाचा खोलवर वेध घेणाऱ्या साहित्यिक मंडळींच्या खाजगी पत्रांमधूनही बऱ्याचदा वैश्विक चिंतनाची चित्रे उमटत असतात. या अंकातील या संदर्भातील लेख वाचकांना खास करून आवडेल असे वाटते. जैवतंत्रज्ञान, जैविक दहशतवाद हे आजचे बहुचर्चेतील विषय आहेत. त्यांचाही वेध या अंकात घेतला आहे.

वाचकांची मत-मतांतरे मोकळेपणाने स्पष्ट व्हावीत यासाठी वाचकांनीही लिहिते व्हावे ही विनंती आहेच. ■■

**सूचना - अर्थबोधपत्रिकेचे वर्ष एप्रिल २००४ ते मार्च २००५ असे आहे, (खंड ३ अंक १ ते १२). त्यापैकी हा दहावा अंक आहे. आणि वर्षाअखेरीचा अंक हा मेंदूविषयक संशोधनांचा विशेषांक व जोडअंक असेल, (फेब्रुवारी व मार्च २००५, खंड ३ अंक ११ व १२). म्हणून वाचकांना फेब्रुवारी महिन्याचा अंक न पाठवता हा जोडअंक १० मार्च २००५ रोजी पोस्टाने पाठविण्यात येईल.**

# वाचकांचा प्रतिसाद

ऑगस्ट २००४ च्या अंकात पान ३ वर 'लोकशाहीः ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम' हा चांगला लेख प्रसिद्ध झाला आहे. कॅथॉलिक धर्म लोकशाहीला पाठिंबा देतो; कारण, त्यात त्यांचे व्यापक हित आहे. विविध बऱ्यावाईट मार्गांनी धर्मांतरण घडवून ख्रिश्चनांची संख्या वाढवायची. त्यांचा राजकारणावर सहजपणे प्रभाव वाढतो. 'कॅथॉलिक पार्टी' असे नाव धारण करावे लागत नाही. कोणाला मत द्यायचे, याचे मार्गदर्शन चर्चमधून मिळते. पूर्वांचल प्रदेशांत हे ठळकपणे दिसते. केवळ ख्रिश्चनांच्या संख्येच्या बळावर इंडोनेशियातून तिमोर भाग वेगळा काढावा लागला.

ख्रिश्चन व इस्लाम धर्मही धर्मनिष्ठा ही राष्ट्रनिष्ठेपेक्षा मोठी/श्रेष्ठ अशी शिकवण देतात. वास्तविक राष्ट्रनिष्ठा ही धर्मातीत असावी हे राष्ट्रहिताचे आहे.

*ग.गो. फडके, दादर, मुंबई.*

नोव्हेंबर २००४ च्या अंकातील 'परोपकार, उदारता आणि देणग्या' ह्या चाकोरीबाहेरील विषयावर विचार व विश्लेषण चांगल्या रीतीने मांडले आहे. भारताची ह्याची टक्केवारी एक टक्क्याच्या दहाव्या भागाइतकी कमी आहे. अशी टक्केवारीमध्ये दरी असण्याची काही कारणे डोळ्यासमोर येतात. ती अशी - (१) अमेरिका हा आर्थिक सुबत्ता असलेला देश असल्याने जनतेच्या क्रयशक्तिपैकी काही भाग अधिकृत धार्मिक देणग्या देण्यांकडे जास्त कौल असू शकेल. (२) आपल्याकडे ग्रामीण भागापासून ते शहरांपर्यंत अमेरिकेच्या मानाने कितीतरी अधिक देवालयांची संख्या आहे. जनता आपल्या कुवतीनुसार धार्मिक देणग्या देवालयांतील पेट्यांतून टाकत असते. इतर धर्मदाय संस्थांना देणग्या देण्याचा कौल तसा कमी आहे. ह्या सगळ्या देवालयांना मिळालेल्या देणग्यांचा तपशील धार्मिक देणग्यांची टक्केवारी काढताना मिळणे मुष्किल आहे कारण कितीतरी देवालये खाजगी मालकीची पण आहेत.

(३) आपल्या देशात देणगी देणारे कितीतरी दाते असे आहेत की ते प्रसिद्धी पराङ्मुख राहाणे पसंत करतात. तर काहींची देणगी काळ्या पैशाच्या संचयातून दिलेली असल्यास प्राप्तीकराची भानगड मागे लागू नयेत म्हणून देणग्या जाहीररीत्या देत नाहीत देशाची देणग्यांची टक्केवारी काढताना ही रक्कम साहजिकच धरली जात नाही, परिणामी टक्केवारी कमी दिसते. लेखात म्हटल्याप्रमाणे देशाची करप्रणालीसुद्धा दात्यांच्या उत्पन्नावर थेट परिणाम घडवून आणते. *(पान क्रमांक २४ वर पाहावे)*

राजकीय

# अहिंसक समाजरचनेच्या दिशेने

येत्या ३० जानेवारीला महात्मा गांधींची सत्तावनावी पुण्यतिथी असेल. गांधींनी सुमारे ५४ वर्षे राजकारण केले आणि त्याहीपेक्षा अधिक वर्षे, त्यांचे प्रत्यक्ष राजकारण संपून झाली. भारतातील आजच्या राजकारणाला तरी गांधीचा वसा नाही; त्यांच्या मूलभूत विचारांचा वासही नाही. परंतु गांधींनी दिलेली, सत्याच्या बाजूने धैर्याने उभे राहण्याची प्रेरणा आणि जगाला शांततेच्या दिशेने नेऊ शकणारी अहिंसक राजकारणाची दिशा अजूनही कुठे कुठे तेवते आहे याचा प्रत्यय येतो.

रिचर्ड फॉक हे प्रिन्स्टन विद्यापीठत 'आंतरराष्ट्रीय कायद्या'चे सन्मान्य प्राध्यापक आहेत. ब्रिटनमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'रिसर्जन्स' मासिकात (जानेवारी - फेब्रुवारी २००४) 'अ न्यू गांधीयन मोमेंट ?' या शीर्षकाचा त्यांचा एक लेख आहे. जगातील अनेक पुढारी, धोरणकर्ते किंवा विचारवंत हे कसे आता कोणत्याही प्रकारच्या हिंसेला मूठमाती देण्याचा विचार करताहेत याचा आढावा फॉक यांनी घेतला आहे. अकरा सप्टेंबरची अमेरिकेतील घटना आणि त्यानंतरचे बदललेले वास्तव हे आता कसे वेगळ्या नजरेने पाहिले पाहिजे, याचाही सल्ला ते देतात.

खूप पूर्वी म्हणजे १९३१ मध्ये गांधीजींनी असा विचार मांडला होता की कोणताही बदल हा लाभदायक ठरायचा असेल तर तो अहिंसक लढ्यानेच प्राप्त करायला हवा. गांधीजी म्हणतात, माझ्या देशाला रक्तलांछित स्वातंत्र्य प्राप्त करण्याऐवजी मी त्यासाठी युगानुयुगे थांबायला तयार आहे. मला माझ्या हृदयाच्या अगदी आतल्या कप्प्यात, असे जाणवते आहे की, रक्त सांडण्याला जग आता कंटाळले आहे. जगाला आता वेगळ्या वाटेची मनीषा आहे; आणि माझा असा ठाम विश्वास आहे की या अशा भुकेल्या जगाला, नवा मार्ग देण्याचा विशेष अधिकार हा, या भारताच्या पुरातन भूमीला आहे. "रिचर्ड फॉक म्हणतात की, गांधींची काळाची नि स्थानाची परिमाणे जरी चुकली असली तरी ती वेळ, गांधींचा तो क्षण आता आलेला आहे. जगभर आता युद्धे आणि हिंसा यांचा लोकांना तिटकारा वाटू लागला आहे. जग आता खरोखरच वेगळी वाट धुंडाळत आहे. गांधींना त्यावेळी झालेले अंतर्ज्ञान त्यावेळेपेक्षा आज अधिकच लागू

पडते आहे. परंतु, अहिंसेला प्रमाण मानणारे जग कधीतरी अस्तित्वात येईल का ? असा प्रश्न स्वतःच उपस्थित करून, रिचर्ड फॉक त्याला उत्तर देतात ते मोठे मार्मिक आहे. ते म्हणतात, गांधीजींच्या दूरदृष्टीची एक वेगळी बाजू आहे. गांधीजींनी शोषक शक्तींच्या विरोधातच संघर्ष उभारला होता. गांधीजी म्हणाले होते की अशा परिस्थितीत, काहीतरी कृती करणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य ठरते.

अगदी १९३१ साली ब्रिटिश वसाहतवादापासून देशाची सुटका करून घेण्याच्या संदर्भात, असहकारितेची चळवळ करताना गांधी म्हणाले होते, "आम्ही अटक करवून घेत आहोत कारण, आजचे तथाकथित स्वातंत्र्य ही खरे तर गुलामीच आहे. आम्ही शासनशक्तीलाच आव्हान देत आहोत कारण त्याची कृती ही संपूर्णतः पापमय आहे. आम्हाला हे सरकार उलथवून टाकायचे आहे. आम्हाला असे दाखवून द्यायचे आहे की सरकारचे अस्तित्व हे लोकसेवेसाठी असते. लोकांचे अस्तित्व सरकारची सेवा करण्यासाठी नसते."

गांधीजींच्या या भूमिकेवरून बोध घेऊन रिचर्ड फॉक म्हणतात की, "गांधींचा 'तो क्षण' पुन्हा अवतारायचा असेल तर दोन्ही अंगांनी माणसातील चैतन्याचे सामर्थ्य अजमावले पाहिजे. पहिले म्हणजे, एक राजकीय हत्यार म्हणून हिंसेचा त्याग केला पाहिजे आणि दुसरे म्हणजे, न्याय्यतेसाठीचा लढा उभा केला पाहिजे. यांपैकी कोणतीही केवळ एक गोष्ट निरूपयोगी ठरेल. आजच्या जगात दोन भिन्न वृत्तींमधील संघर्ष उभा ठाकलेला दिसून येतो. एका बाजूला संपूर्ण युद्धात गुंतलेले धार्मिक वा ऐहिक अतिरेकी आणि दुसऱ्या बाजूला दूरदृष्टी असलेला एक असा वैश्विक समाज की जो शांतता, न्याय्यता आणि जीवनसातत्य यांच्यासाठी धडपड करतोय."

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात घडलेल्या तसेच त्यापूर्वीच्याही काही घटना या वातावरणाची साक्ष देणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, १९७८-७९ मध्ये इराणमध्ये क्रांती झाली. तेथील शहांचे सैनिकी राज्य उलथवून टाकण्यात आले. मुख्य म्हणजे हा सर्व लढा जनतेने उभारलेला होता आणि तोही अहिंसक मार्गांचा अवलंब करून. फिलिपिन्समधील फर्डिनंड मार्कोस यांची भ्रष्टाचारी राजवट उलथवून त्यांना वनवासात पाठवले, तेही जनतेच्या साध्य-साधने यांबाबतच्या अहिंसक शक्तीने. अशाच प्रकारे लोकशाही प्रस्थापनेचे लढे, घाना, नेपाळ, इंडोनेशिया, म्यानमार, तैवान, थायलंड आणि दक्षिण कोरिया या देशांमधील जनतेने जागृत होऊन लढलेले आहेत. मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या कारकीर्दीत, रशियाच्या अंमलाखालील अनेक राष्ट्रांमध्ये मुक्तिसंग्राम

लढले गेले. १९८९ मध्ये लोकरेट्याने बर्लिन भिंत तोडण्यात आली. तद्वतच पूर्व युरोपमधील अनेक देश नव्याने स्वतंत्र झाले. अगदी खुद्द रशियात रक्तविहीन बदल होऊन क्रेमलिनचे वर्चस्व नाहीसे झाले. यातही दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला यांची सत्तावीस वर्षांच्या तुरुंगवासामधून झालेली मुक्तता आणि त्यांच्या नेतृत्वाखाली झालेला घटनात्मक लोकशाहीचा लढा अपूर्व असाच होता.

रिचर्ड फॉक यांचे म्हणणे असे आहे की, अलीकडे उत्पन्न झालेल्या अणुबॉंबच्या धोक्यामुळे जगाला आता अशी वाढती जाणीव होत आहे की, वेगवेगळ्या देशांमधील परस्परसंबंधात युद्ध हे धोरणविषयक हत्यार म्हणून फारसे टिकणारे नाही. १९९० च्या दशकात न्याय्यतेसाठी जागतिक आंदोलने उभी राहिली आहेत. या आंदोलनांमुळे हिंसेला थोपविण्याच्या लोकांच्या प्रयत्नांना चांगली जोड मिळत आहे. अनेक संघटना हत्याकांडांमध्ये उद्ध्वस्त झालेल्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पुढाकार घेत आहेत; तर, आदिवासी जमातींच्या उच्चाटनाच्या अन्यायाविरूद्ध तसेच वसाहतवाद नि गुलामीच्या विरोधात ठिकठिकाणी उद्रेक होत आहेत. राजकीय धोरणे मानवी हक्कांच्या पायावर आखली जावीत, त्यावरच त्यांचा कायदेशीरपणा जोखला जावा, असा विचारप्रवाह, विविध आंदोलनांतून प्रसृत होत आहे. अनेक देशांच्या पाठिंब्यावर मानवनिर्मित आपत्तींपासून समाजगटांचे संरक्षण व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना, वाढती जबाबदारी स्वीकारीत आहे. एवढेच नव्हे तर, मानवजातीवरील गुन्ह्यांची जबाबदारी सैनिकी वा अन्य नेतृत्वावर प्रत्यक्षपणे टाकण्याचा प्रयत्नही करीत आहे.

अर्थात् फॉक म्हणतात त्याप्रमाणे, या सर्व उपाययोजनांमध्ये प्रत्यक्षपणे अहिंसेवर भर नसला तरी त्याचा सर्वसामान्य परिणाम मात्र असाच मानता येतो की, कायद्यांवर आधारित आणि शांततामय मार्गानेच प्रश्न सोडविले जावेत असे आता लोक म्हणू लागले आहेत. या रूपेरी किनारीला काळी बाजूही आहेच. अगदी १९९० च्या दशकातच, सब-सहारन आफ्रिका आणि बाल्कन देशांमधून अत्यंत हिंसक अशा घटना घडल्या आहेत. रवांदामधील वांशिक हत्याकांड हे अशा घटनांचे ठळक उदाहरण आहे. आशियातील लोकशाही प्रस्थापनेचे प्रयत्नही क्रूरपणे चिरडले गेले आहेत. आणि यातच भर पडली ती जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची. उत्पन्न नि संपत्तीची विषमता, पर्यावरणाचा नाश आणि मानवी दुःखांकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्ती या घटनांनी काळे ढग निर्माण केले आहेत. अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या घटनेने तर पुन्हा एकदा गांधीजींच्या अहिंसेकडे दृष्टिक्षेप टाकायला भाग पाडले आहे.

अमेरिका आणि अल-काईदा ही अतिरेकी संघटना, या दोन्ही ११ सप्टेंबरच्या घटनेतील परस्परविरोधी बाजू राजकीय नीतीच्या मर्यादांच्या बाहेरच कृतिशील आहेत. त्यामुळे कुणाचाही विजय होवो, त्यातून हिंसाच मोठ्या प्रमाणावर घडून येणार आहे. युद्धांच्या सर्वसामान्य मानलेल्या मर्यादा उल्लंघण्याचा प्रकार यात घडून येत आहे. विसाव्या शतकातील दोन मोठ्या जागतिक युद्धांमध्येही अगदी सामान्य नागरिकांच्या सर्रास हिंसेला टाळण्याचा प्रयत्न होता. ती मर्यादा आता इथे नाहीशी होत आहे. युद्धकैद्यांचे संरक्षण, जखमींची काळजी घेणे किंवा नागरी वस्तीवर हल्ला न करणे या गोष्टी अल-काईदा आणि अमेरिका दोन्हीही बाजू निर्दयपणे उल्लंघत आहेत.

जगाच्या दुसऱ्या बाजूला मात्र गांधीमार्गाकडे जाणाऱ्या आशादायक घटना घडताहेत. मोहम्मद माहथीर हे मलेशियाचे पंतप्रधान नुकतेच निवृत्त झाले. दिनांक २४ फेब्रुवारी २००३ ला क्वालालंपूर मध्ये झालेल्या, अलिप्त राष्ट्रांच्या तेराव्या परिषदेत, त्यांनी आपल्या भाषणात जोरदार युद्धविरोधी पवित्रा घेतला. त्यांनी या भाषणात मागणी केली की, "युद्धे ही बेकायदेशीर कृत्ये मानली गेली पाहिजेत; आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त राष्ट्रसंघाकडे नियंत्रणाची भूमिका सोपविली पाहिजे. कोणत्याही एका राष्ट्राला, दुसऱ्या राष्ट्रावर नजर ठेवण्याचे केव्हा कोणती पावले उचलायची, याचे अधिकार असताच कामा नयेत." आपल्या या भाषणात, महाथीर यांनी खडा केलेला छद्मी सवाल सर्वांनाच थरारून टाकणारा होता. त्यांनी विचारले, "जेव्हा (दुसऱ्या महायुद्धात) जपानचा पराभव झाला तेव्हा, राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ एक टक्का इतकी रक्कम आपल्या सैन्यावर खर्च करण्याचे बंधन जपानवर लादण्यात आले होते. अशी अट जर जपानवर लादली जाऊ शकते तर ती सर्वच देशांवर लादणे शक्य नाही का?" रिचर्ड फॉक म्हणतात की, खरोखर गांधींचा तो क्षण आता येऊ घातला आहे. त्याला आपल्या कवेत घ्यायचे तर शस्त्रास्त्रांनी घडविली जाणारी हिंसा तसेच विषम व्यवस्थेतून निर्माण होणारी मक्तेदारी नि शोषणाची हिंसा या दोन्हींचे निर्मूलन करायला हवे. ते पुढे असेही म्हणतात की जागतिकीकरण झालेल्या टी.व्ही, वृत्तपत्रे व अन्य प्रसारमाध्यमांमधून इतकी हिंसा व परिणामस्वरूप वेदना क्षणोक्षणी लोकांना पाहावयास मिळते आहे की त्यामुळेच कदाचित आता त्यांना या साऱ्यांची घृणा वाटू लागेल; आणि आपोआपच अहिंसक जगाकडे त्यांच्या अपेक्षांची दृष्टी वळेल. आपण मात्र, अहिंसक समाजरचनेच्या दिशेने जाणीव जागृती करण्याच्या कामाला नेटाने लागले पाहिजे. ■■

विज्ञान - संशोधन

# जैवतंत्रज्ञान व जैविक दहशतवाद

अमेरिकेवर दहशतवाद्यांचा हल्ला झाल्यापासून (११ सप्टेंबर २००१) अमेरिकेतील सुरक्षाविषयक तज्ज्ञ -अभ्यासक, दहशतवादाचा आणखी सखोल व सर्वंकष अभ्यास करताहेत. जैविक दहशतवाद हा त्यांच्या या अभ्यासातील एक विषय आहे. अमेरिका व भारत या दोन देशांमध्ये अतिरेक्यांचे हल्ले होण्याचा इशारा अमेरिकेच्या गुप्तचर खात्याने (सी.आय.ए.) दिल्याचे वृत्त अलीकडेच (नोव्हेंबर २००४) काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. या पार्श्वभूमीवर जैविक दहशतवाद हा विषय समजून घेणे उपयुक्त ठरावे.

अणुबाँबचा शोध लागल्यापासून जग अणुयुद्धाच्या छायेत आहे. तरीही गेल्या पन्नास वर्षांत काही मोजक्याच राष्ट्रांना अण्वस्त्रसज्ज होता आले आहे. जैविक अस्त्रांच्या बाबतीत मात्र काही वेगळे घडण्याची शक्यता आहे. कारण, अनेक राष्ट्रांच्या व राष्ट्रांमधील विविध कंपन्यांच्या जैवतंत्रज्ञानविषयक क्षमता वेगाने वाढत आहेत व त्याचा प्रसारही वेगाने होतो आहे. या क्षमतांचा प्रसार रोखणे हे अशक्य होणार आहे कारण या तंत्रज्ञानाचे आर्थिक, अन्नधान्यविषयक व औषधी उपयोग फार महत्त्वाचे ठरताहेत. या तंत्रज्ञानाचा उपयोग काही वाईट बाबींसाठीही होऊ शकतो. उदाहरणार्थ, या तंत्रज्ञानाचा उपयोग करून काही विशिष्ट रोगांचे जंतू वातावरणात सोडता येणे शक्य होऊ शकेल. त्यामुळे हे तंत्रज्ञान धोक्याचे ठरण्याची शक्यता आहे. दहशतवादी गटांच्या हातात असे तंत्रज्ञान पोचले तर जगासाठी विनाशकारी ठरेल, अशी भीती आहे. जैवतंत्रज्ञानविषयक विविध संशोधनांमध्ये, लष्कराशी संबंधित अधिकारी व्यक्ती रस घेताहेत असे नाही, तर काही खाजगी गट, अभ्यासक -संशोधक हे कायदेशीररीत्या या संशोधनात रस घेताहेत. संगणक व इंटरनेटच्या प्रसारामुळे हे संशोधन सामान्यांपर्यंत पोचण्याच्या शक्यताही वाढत आहेत.

अण्वस्त्रांचा प्रसार होऊ नये, यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेले राजकीय प्रयत्न हे काही प्रमाणात यशस्वी झाले असले तरी, जैविक अस्त्रांच्या संदर्भात

तसे घडेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे सरकारांवर अवलंबून राहणेही इष्ट ठरणार नाही. एकविसाव्या शतकातील नागरी समाजाला आता आपल्या जगाचे भवितव्य आपणच घडवायचे आहे. शांततेच्या दिशेने जगाची वाटचाल व्हावी, असे प्रयत्न करण्याची गरज आता जास्त प्रमाणात वाटते आहे. असे न झाल्यास, संगणकीय व जैवतंत्रज्ञानाच्या या युगात, जगाची वाटचाल, अनिष्ट दिशेने होण्याची शक्यता आहे.

**नागरी समाज व जैविक सुरक्षा**

१९९० दशकात व एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस, जैविक सुरक्षेच्या संबंधी चार क्षेत्रांचा विचार नागरी समाजासमोर उभा ठाकला आहे. **(१) साथीचे रोग** - साथीच्या अनेक रोगांबद्दल जगाला माहिती होती तरी, एच.आय.व्ही/एडस् किंवा सार्स वा एबोला या रोगांनी जगाला हादरविले आहे. एकविसाव्या शतकात वाहतुकीची, साधने व विशेषतः विमान प्रवास वाढल्याने, सार्स सारखे रोग फार वेगाने पसरून मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण करू शकतात.

**(२) मोठ्या लोकसंख्येला एकदम संपविणारे दहशतवादी हल्ले** - ओख्लाहामा किंवा बैरूत येथे झालेले बॉंबस्फोट किंवा अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर अतिरेक्यांनी केलेला हल्ला वा जपानमध्ये भुयारी रेल्वेत प्रवाशांना संपविण्यासाठी केलेले हल्ले हे या प्रकारात मोडतात.

**(३) रासायनिक व जैविक अस्त्रांच्या कराराचे उल्लंघन** - शीतयुद्धाच्या आणि आखाती युद्धाच्या समाप्तीनंतर रासायनिक व जैविक अस्त्रांच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला होता. त्यानुसार या करारात सहभागी होणाऱ्या राष्ट्रांनी अशी अस्त्रे तयार करायची नाहीत, असे ठरविण्यात आले होते. पण तरीही काही राष्ट्रांनी अशी अस्त्रे तयार केलीच. शिवाय अशा अस्त्रांची निर्मिती रोखणे वा त्यांच्यावर काही नियंत्रण ठेवणे हेही शक्य झालेले नाही.

**(४) जैवतंत्रज्ञानातील आश्चर्यकारक प्रगती** - संकरित वनस्पती व तत्संबंधीचे संशोधन हे अनेक वर्षांपासून चालू असले तरी, अलीकडच्या काळात जैवतंत्रज्ञान व पेशींविषयक संशोधन (स्टेम सेल रिसर्च) हे फार वेगाने पुढे जात आहे. अनेक देश व अनेक कंपन्या त्यात सहभागी होत आहेत. थोडक्यात, जैवतंत्रज्ञानाचे जागतिकीकरण होत आहे. यामुळे एकीकडे आरोग्यक्षेत्रात क्रांती घडून येत आहे; तर दुसरीकडे जैविक युद्धाची शक्यताही वाढत आहे. जैविक युद्धाच्या दहशतीखाली, (उदाहरणार्थ - अँथ्रॅक्स) जगाने, विसाव्या शतकातून एकविसाव्या शतकात प्रवेश केला.

## जैविक अस्त्रांची स्पर्धा ?

जैविक युद्धाची शक्यता कशा प्रकारे आहे ? १९९० नंतरच्या कालावधीत जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक प्रयोग झाले व काही नियतकालिकांमध्ये ते प्रसिद्धही झाले. अशा एका संशोधनाची माहिती 'जर्नल ऑफ व्हायरॉलॉजी'ने प्रसिद्ध केली आहे. 'ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी'ने 'माऊसपॉक्स' नावाच्या व्हायरसबाबत संशोधन केले; उंदरांना लागण होणाऱ्या एका रोगाचे हे जंतू होय. 'स्मॉलपॉक्स'च्या (देवी) व्हायरसशी काही साधर्म्य असणारे. यासंबंधीच्या संशोधनात संशोधकांना असे आढळले की, 'इंटरल्युकीन -४' (IL- 4) नावाच्या एका प्रोटीनचा वापर उंदीर करतात. त्यायोगे उंदरांच्या रोगप्रतिकारक शक्तीचे नियंत्रण होत असते. संशोधकांनी 'माऊसपॉक्स'च्या व्हायरसमध्ये 'इंटरल्युकिन -४' घातले; कारण त्यांना उंदरांची रोगप्रतिकारक शक्ती मर्यादित करायची होती. पण या प्रयोगातून भलतेच घडले. नवा व्हायरस हा भयंकर परिणामकारक निघाला व त्यामुळे अनेक उंदीर मेले. ज्या उंदरांना 'माऊसपॉक्स'ची लस दिली होती ते उंदीरदेखील या व्हायरसमुळे मृत्युमुखी पडले.

'माऊ सपॉक्स'चे 'स्मॉलपॉक्स'शी असलेले साधर्म्य आणि मानवी प्रतिकारशक्तीमधील 'इंटरल्युकिन' व उंदरांमधील 'इंटरल्युकिन' यांच्यातील साधर्म्य लक्षात घेता, 'स्मॉलपॉक्स'च्या व्हायरसमध्ये काही बदल घडवून आणणे शक्य होईल. आणि 'स्मॉलपॉक्स'ची लस घेतलेल्या मानवांबाबतही असे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे काही प्रयोग दहशतवादी गटांनी केले तर संपूर्ण जगच अडचणीत येऊ शकेल. अर्थात, 'स्मॉलपॉक्स'चे जंतू दहशतवादी गटाच्या हातात पडणे हे कठीण आहे. ते कडक बंदोबस्तात ठेवण्यात आले आहेत.

जगातून हद्दपार झालेला 'स्मॉलपॉक्स' हा एकच रोग आहे. पोलिओला हद्दपार करण्याचे प्रयत्न जागतिक पातळीवर करण्यात येत आहेत. पण अजून हे प्रयत्न शंभर टक्के यशस्वी झालेले नाहीत. दरम्यान, 'स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क' येथील संशोधकांनी २००२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या एका अभ्यासात म्हटले आहे की, खुल्या बाजारात मिळणाऱ्या काही रसायनांपासून पोलिओचा व्हायरस हा प्रयोगशाळेत तयार करता येणे शक्य आहे. हा व्हायरस तयार करण्यास त्यांना तीन वर्षे लागली. तर दुसऱ्या गटाने अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून फक्त दोन आठवड्यात हा व्हायरस तयार केला. म्हणजे लसीकरणाची मोहिम राबवून पोलिओच्या नैसर्गिक व्हायरसला हद्दपार करण्याचे सरकारांनी ठरविले तरी प्रयोगशाळेतील व्हायरसला सरकार हद्दपार करू

शकणार नाही. विसाव्या शतकात, इन्फ्लूएंझाच्या व्हायरसने कोट्यवधी नागरिकांचा बळी घेतला होता. साथीच्या रोगाचा हा व्हायरस एवढा प्राणघातक कसा असावा असे संशोधन करण्यात येत आहे. यातून मानवी जीवनाची सुरक्षा वाढू शकेल, पण एक तोटा असा होईल की, या व्हायरसवर कोणती आधुनिक औषधे लागू पडतात व कोणती नाही हेही समजून येईल, आणि त्या व्हायरसमध्ये काही बदल घडवून आणणेही शक्य होईल. म्हणजे, समाजकंटक पुन्हा असा साथीचा रोग पसरवून आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. साथीचा रोग पसरविणारे जीवजंतू आणि अँथ्रॅक्ससारखे रोग यांच्यात एक फरक आहे. अँथ्रॅक्स हा माणसामाणसांच्या संपर्कातून पसरत नाही. सार्स किंवा इन्फ्लुएंझा हे संपर्कातून पसरणारे रोग आहेत. अँथ्रॅक्ससारख्या रोगांनी मोठ्या प्रमाणावर जीवहानी व्हावी यासाठी, त्याची अतिशय बारीक पावडर वातावरणात सोडणे आवश्यक असते व त्यासाठीचे तंत्रज्ञान अवगत करणे हे सोपे नाही. मात्र साथीच्या रोगांचे व्हायरस पसरविणे हे तुलनेने सोपे आहे, त्यामुळे भविष्यात अशा रोगांचा प्रादुर्भाव होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे ठरणार आहे.

असे संशोधन व्हायरसपुरतेच मर्यादित राहात नाही. अँथ्रॅक्स किंवा न्यूमोनिक प्लेग यांच्यावरील प्रतिजैविकांना प्रत्युत्तर देणारे बॅक्टेरियाही तयार करणे मायक्रोबॉयॉलॉजीमधील अत्याधुनिक नवतंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. अनेक देशांमध्ये असे वेगवेगळे संशोधन चालू आहे. त्यामुळे जग, अप्रत्यक्षरीत्या अशा जैविक अस्त्रांच्या स्पर्धेकडे वाटचाल करीत आहे असे दिसते.

**जैविक अस्त्रांचा प्रसार रोखायचा कसा ?**

जैवतंत्रज्ञानाचा प्रसार वेगाने होत असल्याने जैविक अस्त्रांचा प्रसारही वेगाने होऊ शकतो. हा प्रसार कसा रोखायचा हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरित आहे. त्यावर, अशा जैविक संशोधनांवर देखरेख ठेवणे, असा एक उपाय सुचविण्यात आला आहे. 'नॅशनल रिसर्च कौन्सिल'ने यासंबंधी काही सूचना केल्या आहेत.

(१) जैविक प्रयोग करण्याच्या विविध योजनांचा आढावा घेणे - 'डिपार्टमेंट ऑफ हेल्थ अँड ह्यूमन सर्व्हिसेस' यांच्यातर्फे याविषयीच्या संशोधनांची कडक तपासणी व्हावी. (२) प्रसिद्ध झालेल्या संशोधनपर लेखांचा आढावा घेणे - राष्ट्रीय सुरक्षा हा विषय लक्षात घेऊन विज्ञानविषयक नियतकालिकांच्या संपादकांनी व संशोधकांनी आपापल्या विषयांतील प्रकाशनांचा अभ्यास करावा व आक्षेपार्ह किंवा धोकादायक ठरू शकणारे संशोधन संबंधितांच्या नजरेस आणावे. (३) आंतरराष्ट्रीय पातळीवर

अशा देखरेख यंत्रणा उभी करणे - अमेरिका व इतर काही देशांनी एकत्र येऊन आपल्याच सर्व संशोधनांवर देखरेख ठेवणे व त्याचबरोबर राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर अशी देखरेख व्यवस्था कार्यरत करणे.

या सूचनांचा अर्थ असा की, शास्त्रज्ञ व संशोधक यांनी आपल्या अभ्यासाचा दुरूपयोग होणार नाही, याची सर्वंकष काळजी घेणे, हे येथून पुढे गरजेचे ठरणार आहे. अर्थात, या सूचनांची अंमलबजावणी होणे सोपे नाही. शिवाय, सरकारी मदत घेणाऱ्या संस्थांवर असे काही बंधन आणता येईलही, पण खाजगी संस्था असे संशोधन किती पुढे नेतील व त्यांच्या कामावर देखरेख करून नियंत्रण कसे आणायचे, हा एक प्रश्न आहेच. समजा, अशी काही देखरेख यंत्रणा अस्तित्वात आली, तरी त्यात तीन प्रकारची आव्हाने उभी राहू शकतात. एक, जागतिक पातळीवरील अंमलबजावणी. दोन, एखादे चांगले संशोधन मागे पडून अयोग्य ठरू शकणारे संशोधन पुढे येणे आणि तीन, चांगले वा वाईट परिणाम घडवून आणणाऱ्या संशोधनाची व्याख्या कोणती ? कारण, एकाच संशोधनातून चांगले व वाईट असे दोन्ही परिणाम निर्माण होतात. जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सध्या अशा विविध प्रश्नांची चर्चा चालू आहे.

अशा संशोधनांच्या नियंत्रणाच्या बाबतीत सध्या तरी सर्वंकष व प्रभावी यंत्रणा उपलब्ध नाही. आणि नवे तंत्रज्ञान म्हणून याकडे अनेक देश आकृष्ट होत आहेत. यासंबंधी काही देशांची धोरणे आक्रमक आहेत, तर काही देश संरक्षणात्मक उपायांच्या दृष्टिकोणातून याकडे बघत आहेत. अशा चर्चेच्या गदारोळात हे कार्य पुढे जात आहे. आणखी एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की, अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी जी काही परिभाषा वापरली जाते, तीच परिभाषा व उपाय यासंदर्भात योग्य ठरतीलच असे नाही. यासंबंधीच्या 'बायोलॉजिकल अँड टॉक्सिक वेपन्स कन्व्हेंशन'नुसार फक्त संरक्षणात्मक संशोधनच कायदेशीर मानले जाते. आणि वस्तुस्थिती अशी आहे की सूक्ष्मजीवशास्त्रीय व जैवऔषधी क्षेत्रातील संरक्षणात्मक संशोधन हे मुळातच आक्रमक ठरू शकते. आणि जर असे संशोधनच जर मूलतःच आक्रमक असेल तर त्याला प्रतिबंध तरी कोण व कसा करणार ?

*[संदर्भ - 'द इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्ट्रॅटेजिक स्टडीज' तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'सर्व्हायवल' (व्हॉल्यूम ४६,नंबर २, समर २००४) या नियतकालिकातील ख्रिस्तोफर चिबा व ॲलेक्स ग्रेनिंगर यांचा 'बायोटेक्नॉलॉजी अँड बायोटेरेरिझम: ॲन अनप्रिसिडेन्टेड वर्ल्ड' हा लेख व अर्थबोधपत्रिका मे २०००]*

कृषी

# जैवतंत्रज्ञान आणि भारत

जैवतंत्रज्ञान या विषयाला अनेक देशांनी आपलेसे केले आहे. जैवतंत्रज्ञानयुक्त पिके मानवी आरोग्याला उपकारक आणि हानीकारक ठरू शकतात, अशा जननिक परिवर्तित पिकांमुळे निसर्गातील विविधता नष्ट होईल, पर्यावरण धोक्यात येईल, अशा चर्चा आंतरराष्ट्रीय पातळीवर झडत आहेत. अमेरिकेने यासंबंधीच्या संशोधनात बराच पुढाकार घेतला असून अशा काही पिकांना व त्यापासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांना परवानगी दिली आहे. युरोपीय बाजारपेठेने मात्र असे खाद्यपदार्थ नाकारले आहे. (पाहा - अर्थबोधपत्रिका जैवतंत्रज्ञान वादग्रस्त ठरणार ? अंक ९, मे २०००, शेतकरी व बियाण्यांमधील जनुकीय बदल -अंक १६, जुलै-ऑगस्ट २००१, जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती वादग्रस्त ठरणार ? अंक १७, सप्टेंबर -ऑक्टोबर २००१, कुपोषणावर वरदान ठरणारे जैवतंत्रज्ञान, डिसेंबर २००४)

या पार्श्वभूमीवर, भारतातही हा विषय तज्ज्ञांमध्ये अभ्यासला जात आहे. अलीकडेच केंद्र सरकारच्या कृषिविभागातर्फे 'शेती व जैवतंत्रज्ञान' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी एक विशेष कृती गट (टास्क फोर्स) स्थापन करण्यात आला होता. या विषयाचे प्रसिद्ध अभ्यासक - संशोधक एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली या समितीने अभ्यास केला. समितीने केलेल्या महत्त्वाच्या सूचना भारतातील 'करंट सायन्स' या विज्ञानविषयक मान्यताप्राप्त नियतकालिकाने प्रसिद्ध केल्या आहेत. याविषयातील आणखी एक अभ्यासक सुमन सहाय यांची, या सूचनांच्या संदर्भातील टीकावजा टिप्पणी देखील 'करंट सायन्स'ने प्रसिद्ध केली आहे. या दोन्ही लेखांवरून 'शेती व जैवतंत्रज्ञान' यासंदर्भातील भारतातील चर्चा समजून येईल.

**भारताचे धोरण कसे असावे ?**

"भारताचे कृषी-जैवतंत्रज्ञान विषयक धोरण हे शेतकरी कुटुंबांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करणारे, देशाची अन्नधान्यविषयक सुरक्षा जपणारे, ग्राहकांच्या आरोग्याची काळजी घेणारे, पर्यावरणीय हित जपणारे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीविषयक उत्पादनांच्या व्यापारात भारताचे हित व सुरक्षा लक्षात घेणारे असावे,"

असे या अभ्यासक गटाचे आदर्श तत्त्व होते, त्याच दृष्टिकोणातून त्यांनी धोरणात्मक सूचना केल्या आहेत. जैवतंत्रज्ञानयुक्त पिके घेण्याबाबत समितीने म्हटले आहे की, जैवतंत्रज्ञानयुक्त (ट्रान्सजेनिक) पिकांकडे 'साहाय्यकारी' या दृष्टिकोणातून बघितले जावे. शेतीविषयक उद्दिष्टपूर्तीसाठी इतर कोणताच पर्याय उपलब्ध नसेल वा अन्य मार्गांचा अवलंब करणे शक्य नसेल, तर जैवतंत्रज्ञानयुक्त पिकांच्या पर्यायाचा विचार अवश्य केला जावा. कीटकांपासून व रोगांपासून पिकांचे संरक्षण हे महत्त्वाचे आहे, त्यासंबंधी जैवतंत्रज्ञानाचा योग्य तो उपयोग करून घेणे गरजेचे आहे. मात्र बासमती तांदूळ, सोयाबीन किंवा दार्जिलिंगचा चहा अशा विशिष्ट उत्पादनांच्या बाबतीत जैवतंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ नये. कारण, त्यांचे नैसर्गिक गुणधर्म लक्षात घेता ही उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताला नफा मिळवून देण्याच्या दृष्टिकोणातून फार महत्त्वाची आहेत. तसेच भारतात, तांदळाच्या व इतर पिकांच्या वेगवेगळ्या जाती पिकविणारे जे नैसर्गिक प्रदेश आहेत, ते भौगोलिक प्रदेश 'कृषि विविधतेचे विशेष क्षेत्र' (म्हणजे एकप्रकारे शेतीसाठी अभयारण्य) म्हणून घोषित करण्यात यावेत. सेंद्रीय शेतीचे क्षेत्रही वेगळे राखण्यात यावे.

मानवी आरोग्य व जैवतंत्रज्ञानयुक्त पिके वा खाद्यान्न यांच्या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेनें काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. त्यांची काटेकोर अंमलबजावणी करूनच ही उत्पादने बाजारात विक्रीसाठी आणण्याची परवानगी संबंधितांना असावी. बाटलीबंद पाणी, शीतपेये व इतर वनस्पती व पिके यांच्यातील कीटकनाशकांच्या अंशांबद्दल 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा विषयक मार्गदर्शक तत्त्वे' आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी. पशुपालन व मत्स्योद्योग यांच्यासंदर्भात जैवतंत्रज्ञानाचा प्रयोग करताना, केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञानविभागाने सांगितलेल्या मार्गदर्शनपर सूचनांचे पालन केले जावे. उदाहरणार्थ, सामान्यतः खाण्यात येणारे प्राणी धष्टपुष्ट करण्यासाठी व प्राण्यांपासून मिळणारे दूध, अंडी, मांस यांच्या उत्पादनात गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्यासाठी वापरण्यात येणारे जैवतंत्रज्ञान अन्नसाखळीतून मानवी आरोग्याला धोकादायक ठरू नये, याची विशेष काळजी घेतली जावी. अन्नसाखळीतून वा वनस्पतींमधून लसी देण्याचा विचारही प्रत्येक घटनेप्रमाणे व घटकाप्रमाणे वेगळा व्हावा. या संदर्भात आणखी सर्वंकष विचार होऊन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची गरज आहे.

या सूचनांप्रमाणेच केंद्र सरकारने दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत उरलेल्या तीन वर्षांसाठी सुमारे १२०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून त्यातून

काय काय करावे हे देखील या समितीने नमूद केले आहे. त्यात, जैवतंत्रज्ञानयुक्त शेतीसंबंधीच्या विविध प्रकारच्या पायाभूत सोयीसुविधा, संशोधनात्मक व धोरणात्मक काम, त्यासाठी लागणारी इमारतींपासून ते मनुष्यबळापर्यंतची यंत्रणा, विविध प्रकारचे प्रशिक्षण, कृषि विविधतेची विशेष क्षेत्रे निर्माण करण्यासाठी योजना, शेतकऱ्यांचे हित व देशाचे व्यापारी हित जपण्यासाठी योजना व यंत्रणा अशा अनेक बाबींचा समावेश आहे. समितीने सादर केलेल्या या सूचनांसंबंधी 'जीन कॅम्पेन'च्या सुमन सहाय यांनी काही टीका-टिप्पणी केली आहे.

**जैवतंत्रज्ञानाच्या वापरासंबंधीचे आक्षेप**

शेतीसंबंधीचे जैवतंत्रज्ञान वापरून जननिक परिवर्तित अन्नधान्य निर्माण करताना विशेष काळजी घेतली जावी, अशी अपेक्षा सुमन सहाय यांनी व्यक्त केली आहे. त्यांची मुख्य काळजी अशी आहे की, जैवतंत्रज्ञान वापरून तयार करण्यात आलेले विशिष्ट भौगोलिक शेतीक्षेत्र आणि परंपरागत नैसर्गिक पद्धतीने तयार करण्यात आलेले शेतीक्षेत्र हे वेगळे ठेवणे व्यवहारात शक्य होईलच, असे नाही. उदाहरणार्थ, जननिक परिवर्तित भातपिकासाठी एखाद्या भागात परवानगी देण्यात आली नाही तरी, त्याच्या जाती-प्रजाती तयार होऊन असे जननिक परिवर्तित पिक, नैसर्गिक पद्धतीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या भागात येऊ शकते. असा प्रकार नवभारत कंपनीने वितरित केलेल्या जैवतंत्रज्ञानयुक्त कापसाच्या (बीटी कॉटन) संदर्भात घडला होता, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. या कापसाचे बी विकत न घेताही कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जमिनीत या कापसाची बीजे रुजली होती; आणि नवभारत कंपनीकडून बी विकत न घेता बीटी कापसाचे उत्पादन करणे हे बेकायदेशीर होते. मेक्सिकोमध्येही अशाच प्रकारची घटना घडली होती. तेव्हा असे विशिष्ट क्षेत्र राखून ठेवणे हे कठीण आहे. एखाद्या पिकाच्या अशा जननिक परिवर्तिक जाती निर्माणच होऊ द्यायच्या नसतील तर त्या पिकासाठी जैवतंत्रज्ञान वापरायचेच नाही, असेच ठरवावे लागेल, असे सुमन सहाय यांना वाटते.

केळी किंवा बटाटा या पिकांमधून लसीकरणाचा मार्गही त्यांना योग्य वाटत नाही. लस असलेले केळे किंवा बटाटा व लस नसलेले केळे किंवा बटाटा यांच्यातील फरक चटकन समजून न येणारा राहील. कारण बाह्यरूप हे सारखेच असणार. त्यामुळे अन्नसाखळीत त्याचा प्रवेश होणारच, असे त्यांना वाटते. त्यामुळे अशा प्रयोगांना त्यांचा विरोध आहे. अशा प्रकारची धान्ये तर वेगळी ओळखता येणे हे अशक्यच होऊन

बसेल. अमेरिकेत स्टारलिंक कॉर्नबाबत असे घडले होते. या प्रकारचे कॉर्न हे पशुखाद्य म्हणून मान्य करण्यात आले होते. पण ते मानवासाठी असलेल्या कॉर्नमध्ये मिसळले गेलेच. अमेरिकेत तर आणखी एक घटना अशी घडली की, एका विशिष्ट प्रकारच्या कॉर्नमध्ये डुकरांसाठी एक लस मिसळण्यात आली होती. ही लस मानवासाठी असलेल्या सोयाबीनच्या पिकात मिसळली गेली होती. या उदाहरणांवरून एवढे नक्कीच स्पष्ट होते की, अमेरिकेसारख्या कडक नियम व नियामक यंत्रणा असलेल्या देशात देखील जननिक परिवर्तित अन्नधान्य हे वेगळे राहीलच याची खात्री देता येत नाही. मग भारतासारख्या देशात यासंबंधीचे गोंधळ होणार नाहीत, असे कशावरून ?

नियमांच्या संदर्भात या अहवालात तंत्रज्ञानविषयक क्षमता आणि पारदर्शकता यांना महत्त्व देण्यात आले आहे. पण सुमन सहाय यांच्या मते, यासंदर्भात नागरी समाजाची भूमिका ही जास्त महत्त्वाची आहे. फिलिपिन्स व आशियातील इतर काही देशांमध्ये नागरी समाजाची भूमिका उल्लेखनीय आहे, असे त्यांनी म्हटले आहे. भारतातील नियामक यंत्रणा ही स्वायत्त असायला हवी आणि अशा यंत्रणेबद्दल नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण व्हावा एवढी ती सक्षम असावी. जैविक सुरक्षा, पर्यावरण व परिसरविज्ञान याबरोबरच या विषयाचे सामाजिक व आर्थिक आयामही लक्षात घेणे हे नियामक मंडळाचे काम असेल. विशेषतः या प्रकारात छोट्या शेतकऱ्यांचे हित जपले जाणे, हेही भारतासारख्या देशात गरजेचे आहे.

नियामक यंत्रणेचे कामकाज विभागले जावे, असे सुमन सहाय यांनी सुचविले आहे. यासाठी एक सल्लागारमंडळ व एक कायदेमंडळ असावे. सल्लागार मंडळात समाजशास्त्रज्ञ, पर्यावरणवादी, शेतीतज्ज्ञ, नागरी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सन्मान्य सदस्य, आदिवासी समाजाचे सदस्य आणि पंचायतींचे प्रतिनिधी अशा सर्वांचा सहभाग असावा. तर कायदेमंडळात जैविक सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा अशा विषयांमधील निष्णात व्यक्ती व तंत्रज्ञ यांचा समावेश असावा. विविध प्रयोग करताना काही धोके निर्माण झाल्यास त्यांना तोंड देणारी 'आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा' उपलब्ध असावी व ती यंत्रणा या कायदेमंडळाचा एक भाग असावी, असे सुमन सहाय यांनी म्हटले आहे.

जैवतंत्रज्ञानाच्या संदर्भात विविध पातळ्यांवर सक्षम व सहभागी यंत्रणा उभ्या राहाव्यात व त्यासाठी टास्क फोर्स साहाय्यभूत ठरावा अशी सहाय यांची अपेक्षा आहे.
*(संदर्भ - 'करंट सायन्स' व्हॉल्यूम ८७, क्रनांक ४, २५ ऑगस्ट २००४)* ■■

साहित्य

# आनंददायक पत्रे

पॉल जॉन्सन यांचा 'द स्पेक्टटर' (ऑक्टोबर २००४) यात एक लेख आहे. पॉल जॉन्सनने लिहिलेला हा लेख म्हणजे अस्तंगत होत चाललेल्या पत्रलेखनाच्या कलेवरील एक शोकांतिका आहे. आपण म्हणतो संज्ञापन आणि माहिती तंत्रज्ञानामुळे जग खूप जवळ आले. परंतु फक्त तांत्रिकदृष्ट्या ! जगातली माणसे एकमेकांच्या जवळ किती आली, हा संशोधनाचा विषय आहे. पत्रांची जागा फोन आणि ई -मेलने घेतली, त्यामुळे संवाद सुकर झाला की तो वाढण्याऐवजी खुंटला ? अगदी परवा-परवापर्यंत खुशालीची बोटभर चिठ्ठी लिहितानाही आपण चार इकडच्या-तिकडच्या गोष्टी पत्रातून व्यक्त करीत होतो. फोनच्या आगमनाने संवाद सहज आणि पट्कन झाला; पण मनातल्या गोष्टी मनातच राहून गेल्या.

पॉल जॉन्सन या लेखात पत्रलेखनाच्या एका वेगळ्याच पैलूवर प्रकाश टाकतात. या पत्रलेखनातून आजवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बरीच वाङ्मयनिर्मिती झाली. एखादा लेखक त्याच्या ग्रंथसंपदेतून जाणून घेण्यापेक्षा त्याच्या पत्रांतून जास्त चांगला कळतो. अत्यंत वैयक्तिक पातळीवर केला गेलेला हा संवाद जेव्हा वैश्विक मूल्यांविषयी बोलू लागतो, तेव्हा त्याला साहित्यिक दर्जा प्राप्त होतो. म्हणूनच साने गुरुजींनी सुधाला लिहिलेली पत्रे वाचावीशी वाटतात, 'कुसुमानिल' मधील कुसुमावती देशपांडे आणि कवी अनिल यांचे हृद्गत जाणून घ्यावेसे वाटते आणि अगदी अलीकडचा जीए आणि सुनीताबाईंचा पत्रातील संवाद वाचकांना समृद्ध करून जातो.

पॉल जॉन्सन म्हणतात, त्याप्रमाणे, पत्रलेखन ही एक कला आहे. ती सर्वांना अवगत असतेच असे नाही. काहींचे पत्र खुशालीच्या चार गोष्टी खरडल्या की संपते तर काही आठ-दहा पानांचे 'ग्रंथ' लिहितात. पॉल म्हणतात, मला बायरन आणि डिकिन्सचा हेवा वाटतो. बायरनने बँक मॅनेजरला पाठविलेले पत्र असो की, डिकिन्सने संपादक म्हणून एखाद्याला लेख नाकारल्याचे लिहिलेले पत्र असो, दोघांची दोन्हीही पत्रे तितकीच वाचनीय असतात. पॉल जॉन्सन स्वतः इतिहासतज्ज्ञ आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या उपयुक्त असा पत्रव्यवहार संदर्भासाठी गोळा करताना पॉल यांना

अशा पत्रांचा संग्रह करण्याचा छंदच लागला. अठराव्या, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील काही प्रसिद्ध लेखकांच्या पत्रांचे खंड त्यांच्याकडे आहेत. शिवाय, मार्गारेट थॅचर, टोनी ब्लेअर, प्रिन्सेस डायना यांनी वेळोवेळी राजघराण्याशी संबंधित आणि राजकीय संदर्भासाठी उपयुक्त पडेल असा पत्रव्यवहारही पॉलच्या हाती सुपुर्द केला आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस टेलिफोनच्या आगमनामुळे पत्रप्रपंच फारसा झालाच नाही असे पॉल यांचे मत आहे.

पॉल यांच्या संग्रहात अनेक नामवंत साहित्यिकांचा पत्रव्यवहार वाचायला मिळतो. थॉमस आणि जेन कार्लाईल हे पती-पत्नी पट्टीचे पत्रलेखक. त्यांनी लिहिलेली पत्रे एकोणतीस खंडांमध्ये ड्युक युनिव्हर्सिटीने प्रकाशित केली. या सर्व खंडांचा समावेश पॉलच्या संग्रहात आहे. जेन आणि थॉमसची जून १८५५ पर्यंतची पत्रे या खंडात आहेत. १८५५ नंतर जेन अकरा वर्षांनी आणि थॉमस सव्वीस वर्षांनी गेला. त्यांच्या पूर्वीच्याच झपाट्याने त्यांनी नंतरही लेखन केले असते तर केवळ या दांपत्याचेच ५० ते ६० खंड करावे लागले असते. एकट्या स्कॉटलंडच्या नॅशनल लायब्ररीमध्येच कार्लाईलची ४,७८० पत्रे आहेत. कार्लाईलने १,००९ पत्रे आपल्या भावाला लिहिली आणि जेनला लिहिलेल्या शेकडो पत्रांपैकी फक्त साडेनऊशे पत्रे आज अस्तित्वात आहेत. कार्लाईलने १८४१ ते ४५ च्या दरम्यान वर्षाला सरासरी १६९ पत्रे लिहिली.जेन तिच्या आयुष्याच्या शेवटी ५-६ वर्षे खूप आजारी होती. पण तरीही वर्षाला ६०-६२ पत्रे लिहिण्याचा तिचा परिपाठ होता.

पत्रातून माणूस जितका आतला आणि खरा कळतो तितका क्वचितच अन्य कुठल्या लेखनप्रकारातून कळत असावा ( अपवाद दैनंदिनीचा ). चार्ल्स डिकिन्स हा अठराव्या शतकातला महान कादंबरीकार. त्याची पत्रसंपदाही विपुल आहे. त्याच्या १४,२५२ पत्रांचे बारा खंड प्रसिद्ध झाले आहेत. या खंडांची किंमत खूप आहे. परंतु फोलिओ सोसायटीने त्यांच्या सभासदांसाठी कमी किंमतीत हे उपलब्ध करून दिले आहेत. या पत्रातील तळटीपा आणि नोंदीचा बारीक-सारीक तपशील इतका व्यवस्थित आहे की, डिकिन्सचे कार्यक्षेत्र बरेच विस्तृत असूनही या पत्रातून व्हिक्टोरियन काळातील मधल्या कालखंडाचे यथासांग दर्शन घडते. पॉल म्हणतात, "एका महान कादंबरीकाराच्या दैनंदिन आयुष्यात डोकावण्याची दुर्लभ संधी आपल्याला या पत्रांतून मिळते. कादंबरी लिहिताना, त्यातील प्रत्येक मुद्याचा अनेक अंगांनी विचार करणाऱ्या डिकिन्सच्या प्रतिभेची भरारी यातून जाणवते. त्याच्या मनाची आंदोलने टिपणारी, त्याच्या दैनंदिन

जीवनातील अनेक बारकावे दाखवणारी ही पत्रे वाचणे हा एक आनंददायक अनुभव असतो."

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील सर्वच साहित्यिक उत्तम पत्रलेखक होते असे नाही. डॉ. जॉन्सनच्या दोनशेव्या जन्मदिनी आर. डब्ल्यू. चॅपमन यांनी त्यांची पत्रे तीन खंडात प्रसिद्ध केली. या खंडाची १९८४ ची दुसरी आवृत्ती पॉल यांच्याकडे आहे. यातील बहुतेक पत्रे त्यांच्या आयुष्यातील शेवटच्या काळातील आहेत. त्यामुळे यात त्यांच्या आजारपणाचे उल्लेखच जास्त येतात. असे असूनही त्यातील काही पत्रे मन हेलावणारी आहेत. १७ जून १७८३ ला डॉ. जॉन्सन यांनी एडमंड ॲलनला लिहिलेले हे पत्र -

Dear Sir,

It hath pleased Almighty God this morning to deprive me of the powers of speech; and, as I do not know that it may be this farther good pleasure to deprive me soon of my senses, I requst you will, on the receipt of this note, come here and act for me, as the exigencies of my case may require. I am,

Sincerely Yours,

S. Johnson.

या पत्रातून समोर येणारे डॉ. जॉन्सन वृद्धत्वामुळे, आजारपणातील वेदनांमुळे ईश्वराधीन झालेले आणि मृत्युच्या कल्पनेने अस्वस्थ झालेले आहेत. डॉ. जॉन्सनची १,५१७ पत्रे आज अस्तितवात आहेत. यांतून त्यांचा आयुष्याबद्दलचा दृष्टिकोण आणि समज कसकशी प्रगल्भ होत गेली हे जाणवते.

पत्रलेखनाच्या परंपरेतील आणखी दोन महत्वाची नावे म्हणजे जेन ऑस्टीन आणि लॉर्ड बायरन. पॉल म्हणतात, "पत्रलेखक म्हणून जेन ऑस्टीन बऱ्याचदा नाउमेद करते. ज्यांनी तिच्या कादंबऱ्यांवर मनापासून प्रेम केले, त्यांना ही पत्रे फारच नीरस आणि क्षुल्लक कौटुंबिक गोष्टींवरची वाटतील." जेनची भाची कॅरोलिन या संदर्भात म्हणते की, जेनने आपली मावशी कॅसेन्ड्राला लिहिलेल्या पत्रांमध्ये तिने उघडपणे काही गोष्टींवर मतप्रदर्शन केले आहे. कॅसेन्ड्राने तिच्या मृत्युच्या आधी या पत्रातील बराचसा भाग जाळून टाकला. १९९५ साली प्रसिद्ध झालेल्या जेनच्या पत्रांच्या आवृत्तीत नष्ट केलेल्या भागाच्या खाणाखुणा दिसतात. पण पॉल म्हणतात १६४ पानांच्या या पुस्तकात जेन खऱ्या अर्थाने भेटते.

रोमँटिक कवी बायरन याचा अकरा खंडांचा पत्रसंग्रहही पॉलकडे आहे. बायरनचा अभ्यासक लेस्ली मर्चंडने जॉक मरे या प्रकाशकासाठी हा संकलित केला आहे. यात बायरनच्या १४,२५२ पत्रांचा समावेश आहे. बायरन वयाच्या छत्तीसाव्या वर्षी गेला. लहान आयुष्यातील त्याची पत्रसंपदा चकीत करते. बायरनने आपल्या आयुष्यातील बराचसा काळ इंग्लंडबाहेर व्यतीत केला. त्यामुळे आपल्या सुहृदांना, प्रकाशकांना पाठविलेल्या पत्रांमुळे ही संख्या मोठी झाली असावी.

अत्यंत संवेदनशील मनाचा चार्ल्स लॅम्ब आद्य निबंधकार म्हणून ओळखला जातो. नर्मविनोदी आणि खुसखुशीत शैलीसाठी तो प्रसिद्ध होता. त्यानेही आपल्या हयातीत शेकडो पत्रे लिहिली. पॉल जॉन्सन म्हणतात, "त्याची बरीचशी पत्रसंपदा गहाळ झाली आहे आणि त्याबद्दल मला सर्वाधिक हळहळ वाटते. त्याची फक्त १,०२७ पत्रेच आज उपलब्ध आहेत." पॉलकडच्या पत्रांच्या खजिन्याने त्यांना गर्भश्रीमंत केले आहे. ते म्हणतात , "या पत्रांनी माझे आयुष्य उजळून टाकले आहे. त्याबद्दल मी या सर्व पत्रलेखकांचा ऋणी आहे. माझी खात्री आहे, मी जेव्हा शेवटचा श्वास घेईन तेव्हा या पत्रांच्याच सान्निध्यात मी असेन." ■■

*(विभावरी शिरूरकर यांनी १९३५ च्या 'प्रतिभा' विशेषांकात प्रकाशक ह. वि. मोटे यांना लिहिलेल्या पत्रामध्ये आपली लिखाणामागील भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच पत्रातून लेखक व लेखनाच्या तंत्राविषयी त्यांनी मतप्रदर्शन केले आहे.)*

*"निर्मितीचे वेड लागलेल्या लेखकाने तंत्रांची कृत्रिमता का जुमानायची? प्रतिभेच्या तुफान आवेगापुढे तंत्राचे कृत्रिम बंध राहणार तरी कसे? सुंदरता - खिळवून धरणारी सुंदरता हवी असेल, स्तिमित करून ठेवणारं सत्य हवं असेल, तर कृत्रिमता फोडून प्रतिभेनं केलेलं नर्तनच हवं, असे वाटायला लागतं. कादंबरी, नाटक, लघुकथा, दीर्घकथा, कहाणी, काव्य, नाट्यछटा - हे आणखी असलेच काही प्रकार, त्यांची तंत्र. सगळे अंतरंगाचे उमाळे त्याच तंत्राच्या चौकटीत बसलेच पाहिजेत का?*

*निःपक्षपाताच्या भूमिकेवरून सहानुभूतिपूर्वक विशाल दृष्टीने प्रतिभावान लेखकाने चितारलेली चित्रे - ती का हृदयंगम वाटणार नाहीत? पिचवून टाकणाऱ्या या जगाची बंधने क्षणभर स्वतःपासून गळून पडल्याचा आभास होऊन निर्व्याज आनंद लेखकाला व वाचकाला का होणार नाही? संकुचित दृष्टी एकदा का नष्ट झाली की तेथे लेखकाप्रमाणेच वाचकाचेही अंतःकरण सहानुभूतीने का उलून येणार नाही?"*

*विभावरी शिरूरकर*

साहित्य

# साहित्यातून स्त्रीवाद जागविणारी अल्फ्राईड जेलिनेक

"We are not permitted to say 'I'. And at the bottom we aren't able to either...That's why I write in such an "exemplary" way ; I don't portray individual fates . I describe a female and actually have the feeling that I'm writing for and with all women."

- Elfriede Jelinek

अल्फ्राईड जेलिनेकचे वरील उद्‌गार म्हणजे तिच्या लेखनाचे सार आहे. अल्फ्राईड जेलिनेकची जगाला ओळख तिला साहित्याचे नोबेल (२००४) मिळाल्यानंतर झाली. तिचा स्वतःचा देश ऑस्ट्रिया. तेथे आणि काही युरोपीय देशांमध्ये तिचे वाचक आहेत. पण बाकी जगाच्या दृष्टीने ती अज्ञातच होती. जेलिनेक पहिल्यापासूनच तिच्या बिनधास्त भाषेमुळे, कट्टर आणि निर्भिड स्त्रीवादी लिखाणामुळे वादग्रस्त लेखिका ठरली आहे. तिने कायमच प्रवाहापासून वेगळ्या, चाकोरीबाहेरच्या विषयांवर लिखाण केले. तरीही स्त्रीवादी लेखन हाच तिच्या लेखनाचा स्थायीभाव आहे.

'नोबेल' जाहीर झाल्यानंतरची तिची विधानेही अशीच बुचकळ्यात टाकणारी आहेत. नोबेल पारितोषिकांच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच नोबेल लॉरिएटचे भाषण पडद्यावर ऐकायला मिळाले. कारण, अल्फ्राईड जेलिनेक पुरस्कार सोहळ्याला (१७ डिसेंबर २००४) उपस्थित राहिली नव्हती. जेलिनेक गेली काही वर्षे अज्ञातवासात आहे. तिला 'सोशल फोबिया' आहे. ती म्हणते, "लोकांच्या चांगल्या किंवा वाईट कुठल्याही प्रकारच्या नजरांमुळे मी अस्वस्थ होते." तिचे आजवरचे लेखन, त्यामागची भूमिका, तिची आजवरची जडण-घडण यांविषयी त्यामुळेच कुतुहल वाटणे साहजिक आहे.

जेलिनेक आज अठ्ठावन्न वर्षांची आहे. ती जितकी प्रतिभाशाली लेखिका आहे, तितकीच ती संगीताची उत्तम जाणकार आहे. व्हिएन्नातील संगीतशाळेत तिने पियानोवादनाचे धडे घेतले. ती ऑर्गनही उत्तम वाजविते. संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर

तिने विद्यापीठात रंगभूमी आणि कलेच्या इतिहासाचा अभ्यास केला. जेलिनेकचे बालपण व्हिएन्नात गेले. आई आणि वडिलांच्या सततच्या आजारपणामुळे तिचा बाळपणीचा बराचसा काळ दुःखाचाच गेला. शाळेचे शिक्षणही कडक शिस्तीत झाले असे जेलिनेक सांगते. विद्यापीठात शिकत असताना तिचा संबंध त्यावेळी युरोपभर कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी चळवळीशी आला आणि येथूनच तिच्या लेखनाला प्रारंभ झाला. याआधी



अल्फ्राईड जेलिनेक या एक स्त्रीवादी लेखिका. समाजकारण व राजकारण यांचा अनुभव घेतलेल्या.प्रगत युरोपमधील ऑस्ट्रिया देशाच्या नागरिक. अलीकडेच १७ डिसेंबर २००४ रोजी त्यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाश्चात्य देशातील स्त्रीवाद हा त्यांच्या लिखाणाचा स्थायीभाव.

बऱ्याच लहान वयात तिने कविता लिहायला सुरुवात केली होती. १९६७ साली तिचा 'Lisas Schatten' (Lisa's Shadow ) हा काव्यसंग्रह प्रसिद्धही झाला होता. पण विद्यार्थी चळवळीत आल्यानंतर तिच्या लेखनाला सामाजिकतेची जोड मिळाली. त्यातूनच 'We are Decoys, Baby!' या कादंबरीचा जन्म झाला आणि यानंतर मात्र तिने पूर्णपणे लेखनाला वाहून घेतले. १९७४ ते १९९१ पर्यंत ती ऑस्ट्रियन कम्युनिस्ट पार्टीची सदस्या होती. परंतु १९९० मध्ये हा पक्ष तेव्हाच्या सरकारमध्ये सामील झाला आणि तिने सक्रीय राजकारणातून अंग काढून घेतले. इतकेच नाही तर तिच्या कुठल्याही नाटकाचा ऑस्ट्रियात खेळ करण्यास तिने नकार दिला.

जेलिनेकची साहित्यसंपदा मोठी आहे. पण वयानुरुप, काळानुरुप तिच्या लेखनात बदल होत गेले. सुरुवातीला तिने भांडवलशाही आणि ग्राहक समाजाला धारेवर धरले. १९८० मध्ये धर्माचे अवडंबर माजविणाऱ्या समाजावर कोरडे ओढले तर नंतरच्या काळात ऑस्ट्रिया आणि जर्मनीतील फॅसिस्ट तिच्या टीकेचे लक्ष्य झाले. जेलिनेकचे बरेचसे लिखाण आत्मचरित्रात्मक वाटते. तिच्या या लेखाच्या सुरुवातीला

दिलेल्या वाक्यातच तिची भूमिका स्पष्ट झाली आहे. समीक्षकही तिच्या म्हणण्याला दुजोरा देताना म्हणतात,"To illustrate an argument through one's experience is to only move towards an explication. One can use oneself as a philosophical case study to strike a robust dialogue with the reader through common experiences and language."

पुरुषप्रधान समाजातील महिलांचे शोषण हा जरी तिच्या लेखनाचा विषय असला तरी, मुख्यतः उच्चभ्रू समाजातील परस्परसंबंध, सत्तास्पर्धा आणि स्वार्थासाठी कुठलीही तडजोड करण्याची तयारी या गोष्टी ठळकपणे समोर येतात. कधी काही राजकीय-सामाजिक उद्देश डोळ्यापुढे ठेवून, तर कधी स्वानुभवांचे प्रकटीकरण करण्यासाठी तिने लिखाण केले. पण जे केले ते वैविध्यपूर्ण होते. जर्मनीतील प्रसिद्ध टीकाकारांनी तिच्या लेखनाला कधीच मोठा दर्जा दिला नाही. परंतु तिची राजकीय भूमिका, तिचा खंबीरपणा, स्वतःच्या भूमिकेशी, विचारांशी ठाम राहण्याची वृत्ती याची अनेकांनी वाखाणणी केली.

तिच्या कादंबऱ्यांची अठरा भाषांतून भाषांतरे झाली. त्यातही 'Wonderful,Wonderful Times' ( Die Ausgesperrten ), 'The Piano Teacher' ( Die Klavierspielerin ), आणि 'Lust' या कादंबऱ्या सर्वात जास्त गाजल्या. Wonderful,Wonderful Times ही तरूण गुन्हेगारांच्या अर्थहीन आयुष्याची कथा आहे. या कादंबरीची भाषा अत्यंत आक्रमक आणि शिवराळ आहे. मध्यमवर्गीय आत्मसंतुष्टपणावर बोट ठेवणारी ही कादंबरी वाचकांना सुन्न करून टाकते. The Piano Teacher या कादंबरीवर मध्यंतरी एक चित्रपटही येऊन गेला. ऑस्ट्रियातील आधुनिक जीवनावरील ही कादंबरी म्हणजे अन्यायाविरुद्ध केलेला उठाव आहे. लैंगिकता, त्यातील विकृती, दडपशाही तसेच मध्यमवर्गीय समाजातील 'बूर्झ्वा' मनोवृत्ती (चौकटीतील आयुष्य आणि लौकिक गोष्टींना महत्त्व देण्याची वृत्ती) यांवर तिने कडाडून हल्ला केला. आई आणि मुलीच्या संबंधावरची ही कादंबरी बरीचशी आत्मचरित्रात्मक आहे. Lust अशीच मध्यमवर्गाच्या बोटचेपेपणाला लक्ष्य करते. महिलांवर होणारा अत्याचार समाज कसा उघड्या डोळ्याने पाहतो हे कादंबरी वाचताना लक्षात येते. उच्चवर्गात कुठलीही गोष्ट हस्तगत करण्यासाठी लैंगिक संबंधांचा कसा वापर केला जातो हेच तिला यातून दाखवायचे आहे. 'आज स्त्रियांनी स्वसामर्थ्यावर सर्व गोष्टी साध्य केल्या असताना, तुमच्या कादंबरीतला स्त्रीवाद अतिरेकी वाटत नाही का?' या प्रश्नाचा समाचार घेताना जेलिनेक म्हणते,'' स्त्रियांनी सर्व गोष्टी मिळवल्या

हे जर खरे असेल तर जगातील संपत्तीचा फक्त एक टक्का वाटा स्त्रियांकडे का? जेलिनेकची नाटके अल्पाक्षरी आहेत. त्यात एकपात्री संवादच जास्त आहेत. तिच्या नाटकांचे खेळ मात्र फार मोठ्या प्रमाणावर होत असत. नाटकांच्या बाबतीत तिने बर्टोल्ट ब्रेशतची 'अँटी थिएटर'ची परंपरा पुढे चालविली. तिचे अलीकडेच आलेले 'Bambiland' हे नाटक अमेरिकेने इराकवर लादलेल्या युद्धावर आधारीत आहे. यात अमेरिकेच्या या कृत्यावर तिने कडाडून हल्ला केला आहे. 'Das Werk' हे नाटक तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेल्या मानवी समाजाची कथा आहे.

'बळी तो कान पिळी' या न्यायाने पुरुषांनी आपल्या बलाचा उपयोग करून स्त्रियांना कायमच आपल्या वर्चस्वाखाली ठेवले. स्वतःचे प्राबल्य सिद्ध करताना

> *लिंगभेदावर आधारलेल्या या समाजव्यवस्थेत पुरुषांच्या व स्त्रियांच्या कर्तृत्वाचे मापदंड निराळे आहेत. पुरुषाचे कर्तृत्व त्याच्या कार्यावर तर स्त्रीचे कर्तृत्व तिच्या शरीरावर जोखले जाते. या अन्यायी समाजव्यवस्थेविरुद्ध माझा लढा आहे; पुरुषांविरुद्ध नाही.*
>
> *- अल्फाईड जेलिनेक*

स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केले. हाच मुद्दा जेलिनेकच्या लिखाणातून प्रकर्षाने पुढे येतो. या अत्याचारांची वर्णने वाचताना मनाला खूप क्लेश होतात. समीक्षक म्हणतात तिची ही वर्णने वाचताना तिच्या माणुसकीविषयीच शंका उत्पन्न होते. पण जेलिनेक स्वतः याबद्दल म्हणते,''मला समाजात जे दिसले, ते आणि तसे मी लिहिले. समाजव्यवस्था किती ढासळली आहे याचेच हे द्योतक आहे. या गोष्टी जर मी इतक्या भडकपणे मांडल्या नसत्या तर त्या तितक्या तीव्रतेने लोकांपर्यंत पोचल्या नसत्या.''

जेलिनेकने आपले लिखाण समाजसुधारणेसाठी हत्यार म्हणून वापरले. यासाठी तिची राजकीय विचारांची पार्श्वभूमी खूपच उपयोगी पडली. तिच्या बंडखोर विचारांमुळे, लेखनामुळे अनेकजण दुरावले पण त्यांनाही कुठेतरी एक निर्भय स्त्रीवादी लेखिका म्हणून तिच्याबद्दल आदर आहे. तिच्या साहित्याने अन्यायाविरुद्ध जनमत तयार केले.तिच्या लेखनावर वेळोवेळी वाद-प्रतिवाद झाले. त्यामुळे स्त्रियांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे पडले.

कादंबरीच्या पानापानांत हिंसा ठासून भरली असेल, अश्लील वर्णने असतील तर ती जास्त 'सेलेबल' होते असे म्हणतात. हाच जर जेलिनेकचा उद्देश असता आणि

जास्तीत-जास्त पैसा कमावून तिला प्रसिद्धी मिळवायची असती, तर नोबेल पुरस्काराच्या घोषणेने तिला आनंद झाला असता. पण हा पुरस्कार मिळाल्याने ती जास्त अस्वस्थ आहे. कारण तिला लोकांचे लक्ष स्वतःकडे नाही तर, समाजाकडे वेधायचे आहे. ती खऱ्या अर्थाने प्रसिद्धी पराङ्मुख आहे.

(संदर्भ - इंटरनेट, द हिंदू १७ ऑक्टोबर २००४)

---

*(पान क्रमांक २ वरून)*

शेवटचे कारण असे की, आपल्या देशात राजकीय पक्षांना मागील दरवाजाने देणगी देण्याची पद्धत अधिक आहे. त्याचाही परिणाम धार्मिक देणग्यांवर होतोच. लेखामध्ये स्वेच्छाकार्य म्हणून लोकांनी समाजकार्यासाठी दिलेला वेळ हे खरोखरीच देणगीचे नवीन परिमाण आहे. परंतु ह्या परिमाणांचा जास्तीत जास्त चांगल्या रीतीने उपयोग केला गेला तर कितीतरी सत्कार्य लोकांकडून घडू शकेल. परंतु तशी मानसिकता लोकांमध्ये हवी. हल्ली समाजकारण व राजकारण ही जनताभिमुख कार्ये न राहता ती पैसे कमवायची साधने बनली आहेत. तेथे हे स्वेच्छाकार्याचे मोजमाप कसे करणार ?

माझा स्वतःचा अनुभव म्हणून सांगू इच्छितो की, बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यावर मी माझा काही वेळ सामाजिक, शैक्षणिक संस्थांना देतो, तसेच वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून लेख लिहितो, त्याचे उत्पन्न मला किती मिळते असे विचारणारे सुशिक्षित महाभाग मला भेटतात. ह्याला काय म्हणावे ? आताच्या काळात 'अर्थबोध' असा घेतला जातो हे दुर्दैव !

परोपकार, उदारता आणि देणग्या ह्यांना हल्लीच्या राजकारण्यांनी एक वेगळाच पैलू पाडला आहे. तो म्हणजे कर -रूपाने जमविलेल्या महसुलातून वीजबिलमाफी, कर्जमाफी असा सरकारी धर्मदाय, सरकारी तिजोरीतून चालू आहे. ह्यावर कळस म्हणून डिसेंबर महिन्याच्या सुरूवातीला मध्यप्रदेशात रेल्वे रुळांवर चालत असताना एकमेकांशी भांडत असता बारा युवक भरधाव एक्सप्रेस गाडीखाली चिरडून ठार झाले. आता येथे चूक कोणाची ? अर्थात, त्या युवकांची, की ज्यांनी भरधाव येणारी गाडी बघितली नाही. तरीसुद्धा रेल्वेखात्याने त्या मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी एक लाख रुपये मदत जाहीर केली. मध्यप्रदेश सरकारनेही अशीच मदत घोषित केली. ह्याला परोपकार, उदारता का देणगी म्हणायचे हे ज्याने त्याने ठरवावे.

*सुधीर देशपांडे, अंधेरी पूर्व, मुंबई.*

आरोग्य

# साखरेला (कडू) पर्याय

साखरेला पर्याय म्हणून कमी उष्मांक असलेली बरीच 'शुगर फ्री' उत्पादने बाजारात उपलब्ध आहेत आणि काही येऊ पाहात आहेत. 'नीओटेम' हे त्यापैकीच एक उत्पादन सध्या भारतात येण्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणखात्याच्या हिरव्या कंदिलाची वाट पहात आहे. कोकाकोला आणि न्युट्रास्वीट कंपनी यांच्याकडे नीओटेमचे पेटंट आहे. कोकाकोला कंपनीला त्यांच्या शीतपेयांमध्ये नीओटेमचा वापर करायचा आहे. त्यामुळे या दोघांनी मिळून आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाकडे धाव घेतली आहे.

न्युट्रास्वीट कंपनीने तयार केलेल्या अस्पारटेम या आणखी एका उत्पादनापासून नीओटेम तयार केले जाते. अस्पारटेमचे आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याने अमेरिकेतही १९९७ पर्यंत त्याला मान्यता नव्हती. या दोन्ही उत्पादनांचा हा इतिहास बघून भारतातही आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने लखनऊच्या 'इंडस्ट्रियल टॉक्झिकॉलॉजी रिसर्च सेंटरला' भारतात वापरल्या जाणाऱ्या सर्वच शुगरफ्री उत्पादनांची चाचणी करण्यास सांगितले आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या अस्पारटेम, सुक्रॅलोज, सॅक्रिन आणि ॲक्सलफेम -के यांपैकी सॅक्रिन बऱ्याच वर्षांपासून वापरले जाते. २५ जून २००४ पासून सुक्रॅलोज कार्बनयुक्त शीतपेयांमध्ये, तर अस्पारटेम आणि ॲक्सलफेम -के मिठाईसारख्या अन्नपदार्थांमध्ये वापरले जाते.

ज्याठिकाणी नैसर्गिक साखर खूपच महाग असते, तिथे अशी कृत्रिमरित्या गोडी आणणारी उत्पादने तयार केली जातात. परंतु ही रासायनिक असल्याने त्यांच्याकडे पहिल्यापासूनच संशयाने पाहिले गेले. आपण अस्पारटेमचेच उदाहरण घेऊ. १५ सप्टेंबर २००४ रोजी जो बेलन या वकीलाने न्युट्रास्वीट कंपनी, अमेरीकन डायबिटीज असोसिएशन आणि मॉन्सॅन्टो कंपनी यांच्यावर ३५ कोटींचा दावा गुदरला. हे सर्वजण ज्या अस्पारटेमचे उत्पादन करीत आहेत त्यातून संधिवात, अस्थमा, मेंदूचा कॅन्सर, अतिसार, अतिरिक्त ताण, विस्मृती आणि दृष्टीहीनता या व्याधी उद्‌भवतात असा त्यांचा आरोप आहे.

न्युट्रास्वीट कंपनीची मालकी पूर्वी मॉन्सॅन्टोकडे होती. सॅक्रिनचे मूळ पेटंटही याच कंपनीकडे होते. परंतु २००० सालच्या दरम्यान त्यांनी या व्यवसायातून अंग काढून घेतले. अस्पारटेम मधुमेहाला घातक असतानाही त्याला कुठलाही आक्षेप न घेतल्याबद्दल अमेरिकन डायबिटीज असोसिएशनला याआधीही दोषी धरण्यात आले आहे.

बेलन म्हणतात, "अस्पारटेमचा शोध १९६५ साली अमेरिकेत लागला. जी डी सिअर्ल आणि कंपनीने त्याचा शोध लावला. त्यानंतर पाच वर्षांनी १९७० मध्ये त्याची पहिली चाचणी झाली. यासाठी माकडाच्या सात अर्भकांना हे रसायन दूधातून देण्यात आले. त्यापैकी एक अर्भक मेले आणि पाच जणांच्या हालचाली मंदावल्या." असे असूनही कंपनीने अन्न आणि औषध व्यवस्थापनाकडे (Food & Drug Administration) मंजुरीसाठी अर्ज केला आणि १९७४ मध्ये त्यांना याच्या कोरड्या पदार्थातील मर्यादीत वापरासाठी परवानगीही मिळाली. परंतु हे रसायन बाजारात येण्यापूर्वी वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीतील मानसशास्त्र आणि मज्जातंतूशास्त्र ( neuropathology ) विभागाचे प्रमुख जॉन ओलने यांनी अस्पारटेममुळे मेंदूला बाधा उत्पन्न होऊ शकते म्हणून त्याला आक्षेप घेतला होता. अन्न आणि औषध व्यवस्थापनाने (एफडीए) त्यांची मंजुरी काही काळाकरिता स्थगित केली आणि १९७५ मध्ये या प्रकरणाची शाहानिशा करण्यासाठी कृती समिती नेमली. या समितीला आढळून आले की, या चाचणीसाठी केले गेलेले प्रयोग अत्यंत वाईट पद्धतीने केले गेले आणि या चाचण्यांचे निष्कर्ष सोयीस्कर बदलले गेले असे बेलन यांचे म्हणणे आहे. डोनाल्ड रम्सफेल्ड ( अमेरिकेच्या मंत्रीमंडळातील बुश यांचे सहकारी ) यांनी १९७७ साली सिअर्ल कंपनीचे अध्यक्ष या नात्याने तोडगा काढायचा प्रयत्न केला. सिअर्ल कंपनीने अन्न आणि औषध प्रशासनाकडे पुन्हा अर्ज केला आणि १९८१ मध्ये अस्पारटेमला मान्यता मिळाली. दोन वर्षांनी हे रसायन शीतपेये आणि मुलांच्या शक्तिवर्धकांमध्ये वापरण्याची परवानगीही त्यांना प्रशासनाकडून मिळाली. मॉन्सॅन्टो कंपनीने १९८५ साली सिअर्ल कंपनी ताब्यात घेतली आणि पुढे अस्पारटेमची विक्री करण्यासाठी न्युट्रास्वीट कंपनीची स्थापना केली. १९९६ मध्ये ओलनेने शोध लावला की, अस्पारटेममुळे ब्रेन ट्युमर होऊ शकतो. परंतु तोपर्यंत हे रसायन भारतासहित अनेक देशांमध्ये विकले गेले होते.

मे १९९८ मध्ये बार्सिलोना युनिव्हर्सिटीतील काही संशोधकांनी अस्पारटेम कार्बनच्या काही अणूंबरोबर ( carbon-14 isotope ) वापरले. त्यांना आढळून आले

की, शरीरातील लहान आतड्यातील किमोट्रिपसीन या द्रव्याच्या संपर्कात येऊन त्यापासून विषारी मिथेनॉल तयार होते. ज्या द्रव पदार्थांमध्ये अस्पारटेम असते, त्यांच्यापासून ८६ ० फॅरनहाइटला मिथेनॉल तयार होते. त्यानंतर त्याचे फॉर्माल्डीहाइडमध्ये रुपांतर होते आणि सर्वात शेवटी त्यापासून फॉर्मिक ॲसिड बनते. या ॲसिडमुळे उलट्या, अतिसार आणि प्रसंगी मृत्यूही ओढवू शकतो. नव्वद टक्के अस्पारटेम फेनिललानाइन आणि अस्पार्टीक ॲसिड या दोन प्रकारच्या अमिनो ॲसिडपासून तयार होते. एखाद्या पदार्थात अस्पारटेम मिसळले, तर त्या पदार्थातील इतर अमिनो ॲसिडबरोबर ते मिसळून जाते. परंतु अस्पारटेम फक्त गोडी वाढवण्यासाठी वापरले, तर इतर कुठल्याही अमिनो ॲसिडच्या संपर्कात न आल्याने ते मेंदूसाठी हानीकारक (neurotoxic) ठरते. साखरेला पर्याय म्हणून वापरण्यात येणारी ही उत्पादने मधुमेह आणि स्थुलत्व यांना अटकाव करतात हे विधानही खरे नाही. जुलै २००४ मध्ये प्रसिद्ध झालेला आणखी एक संशोधन अहवाल.. सांगतो की, गोडी वाढविणाऱ्या 'लो-कॅलरी' (कमी उष्मांक) पदार्थांमुळे शरीराची अन्नाची भूक आणि शारीरिक वजन यांचा समतोल बिघडतो. यामुळे शरीराचे वजन घटते. चव आणि उष्मांक यांचा परस्परसंबंध बिघडतो. म्हणजे साखरेऐवजी आपण पर्यायी रसायन वापरले तर शरीराच्या स्वतःच्या कॅलरी मोजण्याच्या क्षमतेत त्रुटी येते. त्यामुळे नंतर साखरेचा जरी वापर केला तरी पूर्वानुभवामुळे शरीर, प्रत्यक्षात जास्त उष्मांक असूनही कमी उष्मांक मोजते आणि त्यामुळे आपल्याकडून अतिरिक्त खाल्ले जाते.


आजवर याबाबतीत इतके संशोधन होऊनही, त्यावर वेळोवेळी आक्षेप घेतले जाऊनही या माहितीकडे जाणून-बुजून डोळेझाक केली जात आहे कारण या उत्पादनांमुळे कंपन्यांना खूप मोठा धंदा मिळाला आहे. या उत्पादनांचा अमेरिका हा सर्वात मोठा ग्राहक आहे. अमेरिकेच्या या बाजारपेठेचा ७० टक्के भाग अस्पारटेमने मिळवला आहे तर ३० टक्के भाग सॅक्रिनचा आहे. याचा अर्थ असा तर नव्हे की, हा व्यवसायही आता जुन्या पेटंट न लागणाऱ्या उत्पादनांकडून फायद्यासाठी या नवीन उत्पादनांकडे वळत आहेत ? न्युट्रास्वीट कंपनीचे येऊ घातलेले नीओटेम हे उत्पादन अस्पारटेमपेक्षाही महाग आहे. या कंपनीचा आता असाही दावा आहे की, नीओटेम अस्पारटेमपेक्षा जास्त सुरक्षित आहे. पण हे केवळ धंद्यातील डावपेच असावेत.

भारतीय साखर उद्योगाला मात्र या पर्यायी उत्पादनांचा चांगलाच फटका बसणार आहे. आपल्याकडची ग्रामीण अर्थव्यवस्था या व्यवसायावर बरीचशी अवलंबून

आहे. भारतातील साखर कारखाना संघटनेचे अध्यक्ष एम. एन. राव याबाबतीत म्हणतात, "पन्नास हजार शेतकरी, त्यांचे कुटुंब, चारशे कारखान्यांमधून काम करणारे पाच लाख कामगार, ऊस कामगार आणि दोन कोटी टन साखरेची वाहतूक करण्यासाठी लागणारे मालवाहतुकदार या सर्वांचा विचार केला तर कृत्रिम साखरेचा विचारही मूर्खपणाचा ठरेल."

मुख्य मुद्दा असा आहे की, नीओटेमच्या आयातीमुळे आपल्या सॅक्रिनची मागणी कमी होणार आहे. सॅक्रिन खाल्ल्यानंतर धातूसारखी चव मागे राहते तशी नीओटेममुळे राहात नाही. त्यामुळे त्याची मागणी कदाचित वाढूही शकते. सॅक्रिनला वरून नीओटेमचे आवरण करता येईल. पण भारतात अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत असे करता येत नाही. सॅक्रिन उत्पादक संघटनेचे माजी अध्यक्ष जे.सी. काथरानी यासंदर्भात म्हणतात, "अस्पारटेमसंदर्भात आरोग्य आणि कुटुंबकल्याण खात्याकडे आम्ही जेव्हा आमचा विरोध कळवला तेव्हा सॅक्रिनला झुकते माप देण्यात आमचे स्वार्थी हितसंबंध आहेत अशी टीका आमच्यावर केली गेली. सॅक्रिन कसे सुरक्षित आहे हे उलट आम्हालाच सिद्ध करण्यास संगितले आणि हे अभ्यासपूर्ण रितीने सिद्ध करणे आम्हाला परवडणारे नाही." 'इंटरनॅशनल ट्रेड इन अॅग्रीकल्चर अॅन्ड अॅग्रोबेस्ड इंडस्ट्रिज' चे कार्यकारी संचालक विजय सर्दाना म्हणतात, "अशा प्रकारची उत्पादने वापरायचही की नाही याबाबत लोकांचे मत घ्यावे. यासाठी प्रत्येक उत्पादनावर त्यातील घटकांची नावे असावीत. सुरुवातीला या घटकांना तात्पुरती परवानगी द्यायला हरकत नाही. जर एखाद्या वैज्ञानिक समितीने पुराव्यानिशी त्याविरुद्ध आवाज उठवला तर मात्र त्यावर ताबडतोब बंदी घालावी." 'ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस'चे आर. एल. बिजलानी यांच्या मते "आपल्या देशात बरीचशी जनता कुपोषित आहे आणि साखर हा ऊर्जेचा स्रोत आहे. त्यामुळे कमी उष्मांक असणाऱ्या उत्पादनांमुळे शरीराची फसगत होण्याची शक्यता आहे."

आज बऱ्याच कंपन्यांकडून या घटकांची मागणी वाढते आहे. हिंदुस्थान लिव्हरकडून चहा, कॉफी बेस आणि हवाबंद पदार्थांसाठी यांना मागणी आहे. मिठाईमध्येही त्यांच्या वापराला परवानगी दिल्याने त्यांचे प्रत्यक्ष प्रमाण मोजणे अवघड झाले आहे. या रासायनिक घटकांचा शरीरावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. त्यामुळे साखरेसाठी पर्यायी, कुठलेही दुष्परिणाम न होणारे घटक म्हणून त्यांची विक्री करू नये असे जाणकारांचे मत आहे. (संदर्भ - डाऊन टू अर्थ, ऑक्टोबर २००४)



# शांततेच्या पाऊलखुणा

## विकासातून शांततेकडे

कॅनडातील 'पिअरसन पीस कीपिंग सेंटर' ही संस्था शांततेसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करते. 'विकासात्मक कार्यातून शांतता' असे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. संघर्षाच्या प्रश्नाला विकासाची बाजू असू शकते; पण, आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्यांनी १९९७ पर्यंत ही बाब विचारात घेतली नव्हती. औद्योगिकदृष्ट्या प्रगत अशा २३ राष्ट्रांच्या 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट' (ओईसीडी-OECD) या संघटनेने आपल्या कामाच्या संदर्भात काही मार्गदर्शक मुद्दे मांडले; तेव्हा त्यांनी त्यात स्पष्ट केले की, समाजातील विविध घटकांमध्ये चांगले संबंध व शांतता नसेल तर, विकासाचे कार्य स्थानिक नागरिकांच्या मदतीने पार पडणे शक्य होत नाही. यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर, 'विकास व शांतता' असा विषय पुढे आला. 'ओईसीडी'शी संबंधित कार्य करणाऱ्या 'कॅनेडियन इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सी'च्या प्रमुख सुसान ब्राऊन यांनी अनेक देशांमध्ये विकासात्मक कामातून शांततेचा प्रयोग राबविला आहे. सुसान ब्राऊन आता 'पिअरसन पीस कीपिंग सेंटर'तर्फे काम करतात.

'फ्रॉम रिॲक्शन टू प्रिव्हेन्शन' असा विषय घेऊन 'पिअरसन'तर्फे कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. युद्ध होऊ नये असे वाटत असेल तर ते रोखण्याचा विचार करून त्यानुसार कृती केली पाहिजे. युद्ध होऊन गेल्यानंतर विविध प्रकारचे मदतकार्य करणे, हे महत्त्वाचे आहेच. पण त्यापेक्षा जास्त प्राधान्य युद्ध रोखण्याला दिले पाहिजे, असे या संस्थेला वाटते. त्यासाठी अशा कार्यशाळांचे आयोजन केले जाते. विविध देशांमधील युद्धे, त्यात मरणाऱ्यांची व जखमी होणाऱ्यांची संख्या, युद्धग्रस्तांचे हाल, या मन विषण्ण करणाऱ्या घटना आहेतच, शिवाय, त्यानंतर करण्यात आलेले मदतकार्य यात आलेला खर्च व यासाठी विविध संस्थांना, यंत्रणांना घालवावा लागलेला वेळ अशा काही बाबींचा विचार केला तर युद्ध रोखणे (प्रिव्हेन्शन) हे केव्हाही उपयुक्त ठरते, असे या कार्यशाळांमधून बिंबविले जाते. अशा कार्यशाळांचा उपयोग होतो, पण

किती युद्धे यामुळे रोखली गेली हे आकडेवारीतून सांगता येणार नाही. कारण अमुकच एका बाबीमुळे युद्ध रोखले गेले, असे सिद्ध करणे शक्य होत नाही, असे सुसान ब्राऊन म्हणतात.

यासंदर्भात सोमालियाचे उदाहरण बोलके आहे. सोमालियात संघर्षाच्या आधी जे काही मदतकार्य चालू होते त्याच्या १४पट जास्त खर्च संघर्षानंतर झाला. सोमालियात जे गट कार्यरत होते त्या सर्वांना संघर्ष व त्यातील धोके यांची पूर्वकल्पना होती. संघर्षाचा अभ्यास हा गरजेचा आहे कारण त्यातूनच पुढील संघर्ष टाळण्यासाठी व विकासाच्या दिशांकडे वाटचाल करण्याची शक्यता निर्माण होते. एखाद्या देशात पूर्वी झालेल्या हिंसक संघर्षांच्या इतिहासाचा अभ्यास केला तर भविष्यकाळात संघर्ष कसे उद्‌भवू शकतात व त्यांना तोंड कसे द्यायचे हे समजून येते. तसेच एखाद्या देशात वैचारिक पातळीवर राजकीय संघर्ष झाले असतील किंवा चालू असतील तर तेथील नागरिक लोकशाही राबविण्याचा प्रयत्न कसा करतील याचाही अंदाज घेता येतो. देशाची लोकसंख्या, वंश, युवावर्गाची संख्या, नैसर्गिक संसाधनाचा विविध गटांतर्फे करण्यात येणारा वापर, असे समाजजीवनातील अनेक कंगोरे हे संघर्षाचा अभ्यास करताना महत्त्वाचे ठरतात, असे सुसान ब्राऊन सांगतात.

ज्या देशात बेरोजगार युवकांची संख्या वाढते किंवा पर्यावरणाची हानी होते व नैसर्गिक संसाधने कमी कमी होत जातात, तिथे संघर्ष निर्माण होण्याच्या शक्यता वाढतात. सिएरा लिओनमधील संघर्षाच्या अभ्यासातून या बाबी पुढे आल्या होत्या. अन्न मिळणे ही मूलभूत गरज सर्वात प्राधान्याने पूर्ण व्हायला हवी. रिकाम्या पोटी शांततेची वा लोकशाहीची तत्त्वे समजून घेता येणे शक्य नाही.

विकासातून शांततेकडे जाताना आर्थिक, सामाजिक व राजकीय बाजूंचा एकत्रित व सर्वंकष विचार करावा लागतो. अशा वेळी शिक्षणातील एखादा प्रयोग राबविताना तो केवळ विद्यार्थ्यांचा व त्यांच्यासाठीचा शैक्षणिक कार्यक्रम ठरत नाही तर तो संपूर्ण समाजासाठी महत्त्वाचा ठरतो. तसेच शेतीविषयक पाणीवाटपाच्या समस्या सोडविण्यासाठीची योजना तांत्रिक, पर्यावरणीय व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत असली तरी त्यात ज्यांच्या जमिनी जातात किंवा जे विस्थापित होतात, त्यांच्यासाठी ती घटना त्यांची सामाजिक शांतता नष्ट करणारी ठरू शकते. अशा वेळी विविध टप्प्यांवर विविध योजना राबवून विकासाचे काम पुढे न्यावे लागते. अशी आव्हाने पेलणे हे कठीण पण गरजेचे असते. *(संदर्भ - पीस मॅगेझीन, ऑक्टोबर-डिसेंबर २००४)* ■■

# जगाच्या पाठीवर...

## आशिया: जैवतंत्रज्ञानयुक्त अन्नधान्याचे वाढते दुखणे ?

आशियातील अनेक देशांमध्ये जैवतंत्रज्ञानयुक्त खाद्यान्नाचा प्रश्न वादग्रस्त ठरतो आहे. चीन, भारत, ऑस्ट्रेलिया, फिलिपिन्स, इंडोनेशिया अशा काही देशांमध्ये या विषयाच्या बाजूने कृती करण्यात येत आहे; तर, श्रीलंका, थायलंड, म्यानमार, मलेशिया, जपान, दक्षिण व उत्तर कोरिया या देशांमध्ये याच्या विरोधात मत आहे. यासंदर्भात अलीकडेच थायलंडमध्ये एक घटना घडली आहे.

थायलंडनें १९९५ मध्ये जैवतंत्रज्ञानाशी संबंधित प्रयोगांना पाठिंबा दिला आणि अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठबरोबर करार केला. थायलंडमधील हवामानास अनुकूल अशा पपया तयार करण्याचा हा करार होता. तेव्हापासून यासंबंधीची प्रयोगशाळा स्थापन करण्यापासून ते संशोधनाच्या विविध बाबींवर थायलंडने बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला आणि आता हा प्रयोग वादग्रस्त ठरतो आहे; कारण, प्रयोगशाळेतील या पपयांचे बीज जवळच्या शेतांमध्ये रुजले व तेथे जैवतंत्रज्ञानयुक्त पपयांची झाडे वाढू लागली. पर्यावरणवादी गटाने ही बाब शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर ते गोंधळले. कारण त्यांनी या पपयांच्या लागवडीसाठी बी विकत घेतले नव्हते. जैवतंत्रज्ञानयुक्त अशी फळे वा इतर खाद्यान्न देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विक्रीसाठी आणताना बरीच काळजी घ्यावी लागते; शिवाय, ग्राहक ते विकत घेणे नाकारूही शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते. या कारणाने, येथील शेतकऱ्यांनी या प्रकाराविरोधात आपले मत व्यक्त केले. या घटनेनंतर यासंदर्भात थायलंडच्या सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेकडून करण्यात आली आहे.

युरोपीय देश, जपान व न्यूझीलंड येथे जैवतंत्रज्ञानयुक्त खाद्यान्नाला विरोध आहे. थायलंड हा खाद्यान्नाचा मोठा निर्यातदार देश आहे. विशेषतः युरोपीय देश व जपान यांच्याकडे थायलंडमधील खाद्यपदार्थांची मोठी निर्यात होते. युरोपीय देशांमधील जर्मनी हा देश थायलंडकडून प्रक्रिया केल्लेले फळांचे विविध पदार्थ आयात करतो. पण ज्या खाद्यान्नात पपई हा घटक पदार्थ असेल ते खाद्यान्न विकत घ्यायचे नाही, असे

जर्मनीने ठरविले आहे. जपान देखील असा निर्णय घेऊ शकेल. ब्रिटन तर थायलंडकडून आयात करताना, सेंद्रीय पद्धतीने पिकविलेल्या फळांसाठी जास्त किंमत मोजायला तयार आहे. इंडोनेशिया आणि मलेशिया येथे असे प्रयोगशाळेत तयार केलेले खाद्यान्न हे इस्लामच्या तत्त्वात (हलाल) बसेल किंवा नाही याचा विचार करण्यात येत आहे. त्यामुळे थायलंडमधील निर्यातदार अडचणीत आले आहेत. थायलंडच्या सरकारने जैवतंत्रज्ञानविषयक धोरण स्पष्ट करावे, असा दबाव सरकारवर आणण्यात आला आहे.

*(संदर्भ - फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, २८ ऑक्टोबर २००४)* ■■

## जैवतंत्रज्ञानयुक्त गवताचा असाही एक प्रवास !

जैवतंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रांत करण्यात येत आहे. अमेरिकेत याचा एक वेगळा प्रयोग गोल्फच्या संदर्भात करण्यात आला. गोल्फ हा एक श्रीमंती खेळ. दूरवर पसरलेली हिरवळ हे या खेळाचे मैदान असते. खेळाला आवश्यक हिरवळ म्हणजे गवत तयार करण्यासाठी जैवतंत्रज्ञानाने त्यात बदल घडवून आणायचे व ते मोठ्या प्रमाणावर पसरू शकेल असा प्रयत्न करण्याचे अमेरिकेतील संबंधित यंत्रणेने ठरविले. त्यासाठी प्रयोग म्हणून दोन वर्षांसाठी सेंट्रल ओरेगॉन येथे या जैवतंत्रज्ञानयुक्त बेंटग्रास गवताची लागवड करण्यात आली.

या काळात असे लक्षात आले की या गवताचे व तेथे वाढणाऱ्या गवताचे संकर तयार होऊन ते गवत वेगाने पसरले. अगदी दूरवर म्हणजे २१ किलोमीटर्स अंतरापर्यंत परागकण पसरून ते गवत तेवढ्या दूर वाढले. याचा अर्थ काही ठराविक भौगोलिक क्षेत्रात जैवतंत्रज्ञानयुक्त गवताची लागवड केली तरी सभोवतालच्या परिसरात ते वाढू नये म्हणून त्यावर मर्यादा घालता येत नाही.

जैवतंत्रज्ञानाचा उपयोग करून जे प्रयोग करण्यात येत आहेत, त्यामुळे नैसर्गिक विविधता नष्ट होण्याची भीती नेहमीच विरोधक व्यक्त करीत असतात. या प्रयोगात स्थानिक गवत व जैवतंत्रज्ञानयुक्त गवत यांची सरमिसळ झाली तर नैसर्गिक जैविक विविधता अडचणीत येऊ शकेल. संबंधित संशोधकांच्या या अभ्यासानंतरही जैवतंत्रज्ञानयुक्त गवताची लागवड करण्याचा निर्णय संबंधित यंत्रणा घेणार का, हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ ३१ ऑक्टोबर २००४)* ■■

# कालप्रवाहात......

## गरिबीचा पेच

विकसनशील राष्ट्रांसाठी आखण्यात आलेल्या 'मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स' (सहस्रकाची विकास उद्दिष्टे) या योजनेतंर्गत इसवीसन २०१५ पर्यंत आशियातील गरिबी किमान पन्नास टक्क्यांनी कमी करण्याचे ठरविण्यात आले आहे. पण 'एशियन डेव्हलपमेंट बँके'ने हे उद्दिष्ट पूर्ण करता येईल किंवा कसे याबाबत शंका व्यक्त केली आहे. याचे एक कारण असे की, आंतरराष्ट्रीय पातळीवर, गरिबीच्या व्याख्येवर एकमत नाही. गरिबी मोजण्यासाठी रोजची मिळकत प्रतिदिन किमान १ अमेरिकन डॉलर (अंदाजे ४५रुपये) ही जर धरली तर गरिबी घटली आहे, असे म्हणता येईल. १९९० मध्ये आशियातील ३४ टक्के नागरिक एवढेही उत्पन्न मिळवत नव्हते. ही टक्केवारी २१.५ एवढी कमी झाली आहे; म्हणजे गरिबी घटली आहे, असे दिसून येते. पण अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी एवढे उत्पन्न हे पुरेसे मानले जात नाही. त्यामुळे काहींच्या मते प्रतिदिन दोन अमेरिकन डॉलर्स (म्हणजे अंदाजे ९० रुपये) हे किमान उत्पन्न असायला हवे. या किमान उत्पन्नाचा विचार केला तर आशियातील ६० टक्के नागरिक हे दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगताहेत, असे दिसते. आशियातील सर्वात गरीब या गटात मोडणाऱ्यांपैकी दोनतृतीयांश नागरिक हे दक्षिण आशियात राहतात.

भारताच्या संदर्भात विचार केला तर, भारत सरकारने प्रतिदिन ४० रुपये उत्पन्न असणारे नागरिक हे दारिद्र्यरेषेच्या वर धरले आहेत. प्रतिदिन किमान ९० रुपये उत्पन्न या आंतरराष्ट्रीय व्याख्येचा विचार केला तर दारिद्र्याच्या या पातळीत बरीच तफावत आढळते. भारतात, गरीब गटात मोडणाऱ्या नागरिकांपैकी ७५ टक्के नागरिक हे ग्रामीण भागात राहतात, असे 'एशियन डेव्हलपेंट बँके'च्या अहवालात म्हणण्यात आले आहे. प्रतिदिन एक अमेरिकन डॉलर एवढे किमान उत्पन्न धरले तर २०१५ पर्यंत गरिबीचे प्रमाण निम्म्याने घटू शकते, आणि तेही चीन, थायलंड, इंडोनेशिया अशा काही मोजक्याच देशांमधील !

*(संदर्भ - 'की इंडिकेटर्स ऑफ डेव्हलपिंग एशियन अँड पॅसिफिक कंट्रीज,' 'एशियन डेव्हलपमेंट बँक,' डाऊन टू अर्थ, ३१ ऑक्टोबर २००४)* ■■

## 'काल'चे 'आज'साठी

[बरोबर शंभर वर्षांपूर्वी केशवसुतांनी आपल्या मोजक्या कवितांतून, काही गंभीर आणि खंबीर असा विचार त्यांच्या पिढीतील युवकांना दिला. (केशवसुतांचा कविताकाळ हा १८८५ ते १९०५ असा आहे.) आज आचार-विचारांत प्रतिगामित्वाची वावटळ आली आहे; तिला थोपविण्याचे धैर्य येण्यास केशवसुतांच्या अनेक पंक्ती आपल्या सर्वांना विशेषतः युवक-युवतींना उपयुक्त ठरतील.-संपादक ]

### विद्यार्थ्यांप्रत

महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें,
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें;
परि तुजमध्ये महतीचें जें बीज
त्याहुनि काहीं मोठी नाहीं चीज ; -
ठसव मनीं हें साचें, बाबा ! हें वच बहुमोलाचे.

अग्नि असे हा तेजस्वी रे फार,
त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर;
परी किरण जो तुजमध्यें सत्याचा
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा; -
घोक सदा हें वाचे, बाबा ! हे वच बहु मोलाचें.

पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत,
आकाशी तर असंख्य दिसताहेत;
परि एक रत्न तुजमध्ये जें सच्छील
कोणाला नच सर त्याची येईल; -
स्मरण असूं दे याचें, बाबा ! हे वच बहु मोलाचें.

स्नायूमध्यें पुष्कळ आहे शक्ती,
नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती;
परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी -
पठन तर करीं त्याचें, बाबा ! जग हें बदलायाचें

शतकांपूर्वीच जग बदलण्याचा ध्यास केशवसुतांनी घेतला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्देशून लिहितानाही त्यांनी हेच मोठे स्वप्न त्यांच्यासमोर ठेवले आहे. केशवसुत असे मानतात की जग बदलण्याची शक्ती प्रत्येक मनुष्यात आहे; आणि म्हणूनच विद्यार्थ्यांना उपदेश करताना, ते म्हणतात की, "मोठेपणाचे बीज तुझ्यातच आहे, सत्याचा सर्वोत्तम प्रकाश तुझ्यातच आहे, सच्छीलतेचे रत्न तुझ्यात आहे आणि या सर्वांपेक्षाही महान म्हणजे 'शिकलेला शब्द' ज्याची शक्ती इतर कुठल्याही शक्तीपेक्षा मोठी आहे. ती हवे तर साऱ्या जगाला उलथवून लावील; आणि हे लक्षात ठेवून या ज्ञानशक्तीचा उपयोग जग बदलण्यासाठी करायला हवा.

आजच्या पिढीला पुन्हा एकदा केशवसुतांच्या या उपदेशाची गरज आहे. जग बदलण्याचा ध्यास घेणे हे तरूण पिढीचे व्यवच्छेदक लक्षण झाले पाहिजे. ✿✿✿

---


## पाहिजेत

### अर्थबोधपत्रिकेसाठी विक्री प्रतिनिधी

**आपल्या सोयीनुसार प्रबोधनात्मक काम करा व कमिशन बेसिसवर पैसे मिळवा !**


अर्थबोधपत्रिका या वैचारिक मासिकाचे वर्गणीदार वाढविण्यासाठी उत्साही उमेदवार (स्त्री / पुरुष) पाहिजेत. महाविद्यालयीन युवक / युवतीही चालतील.

आपल्या गावात वा शहरात पत्रिकेच्या वर्गणीदारांची संख्या वाढवून कमिशन बेसिसवर मानधन मिळवा. वयाची अट नाही. सविस्तर वैयक्तिक माहितीसह व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका यांच्याकडे संस्थेच्या पत्त्यावर अर्ज करावा.

# आपली स्वप्नं पूर्ण करा !

- गृह कर्ज
- आधार स्कीम
- ग्राहकोपयोगी कर्ज
- किसान क्रेडिट कार्ड
- शैक्षणिक कर्ज
- रिकरिंग डिपॉझिट स्कीम

अवघ्या कुटुंबाची....
अवघ्या समाजाची
बांधिलकी जपणारी...
महाबँक



New Horizon '04

**बँक ऑफ महाराष्ट्र**

'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे-411 005.
www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १००/ - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८०/ - रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४००/- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन लेसन्स फ्रॉम एन्रॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

# अर्थबोध-वृत्त

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे अनेक उपक्रम चालतात. इंग्रजी जर्नल, चर्चासत्रे यांव्यतिरिक्त ग्रंथालयातही नवीन पुस्तकांची आवक सतत होत असते. अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना या ग्रंथालयाचा लाभ घेता येतो. या उपक्रमांचा नि पुस्तकांचा अल्पसा परिचय या सदरामधून देण्याचा आमचा मानस आहे. - संपादक)*

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

**(1) India's Emerging Economy - Performance and Prospects in the 1990s and Beyond; Edited by Kaushik Basu; Published by The MIT Press, Cambridge, Massachusetts, London, England. - pp. 319; Price US $ 45/-**

१९९१ च्या आर्थिक वाताहतीच्या पार्श्वभूमीवर, त्यानंतरच्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली वाटचाल म्हणजे अनेक बाबतींमध्ये एक यशोगाथाच मानावी लागेल. आर्थिक सुधारणांच्या धाडसी कार्यक्रमाचा परिणाम म्हणून या दशकात देशाच्या आर्थिक विकासाचा दर तर वाढलाच, पण विदेशी भांडवल-गुंतवणूकीतही लक्षणीय वाढ झाली. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात झालेला बदल तर केवळ थक्क करणाराच होता. पण यांनाच समांतर म्हणून, पराकोटीचे दारिद्र्य आणि कमालीची सामाजिक व राजकीय अस्थिरता यांचीही अप्रिय उपस्थिती याच दशकात प्रकर्षाने जाणवली. या सगळ्या बऱ्या-वाईट घटनांचा मागोवा प्रस्तुत पुस्तकात घेतला आहे. शिक्षण, धोरण-निश्चिती आणि उद्योग - अशा विविध क्षेत्रांमधील अभ्यासकांनी, भारतीय अर्थव्यवस्थेच्या यशाच्या संदर्भातील वस्तुस्थिती आणि तिचे सामाजिक - सांस्कृतिक आयाम यांचे अतिशय मार्मिक चित्रण या लेखसंग्रहात केले आहे. दारिद्र्य-निवारण, जागतिकीकरण, वित्तीय व राजकोषीय सुधारणांचा आलेला अनुभव आणि माहिती -तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील तज्ज्ञांची मते त्यात ग्रथित आहेत. १९९८ मधील अर्थशास्त्राचे नोबेल पुरस्कार विजेते प्रा. अमर्त्य सेन यांचा Democracy and Secularism in India हा विचारांना प्रेरणा देणारा आणि अन्तर्मुख करणारा लेखही यात आहे. एखाद्या राष्ट्राच्या कामगिरीचे मापन हे काही केवळ त्याच्या आर्थिक प्रगतीच्याच फुटपट्टीने होऊ शकत नाही - हा त्यांच्या लेखातील कळीचा मुद्दा आहे.

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**